रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १७८
www.ramprahar.com
रविवार, १४ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## छत्रपती शंभूराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा शेतकऱ्यांना मान



**महाड :** छत्रपती संभाजी महाराजांचा ३४३वा राज्याभिषेक सोहळा येत्या मंगळवारी (दि.१६) राजधानी किल्ले रायगडवर होणार असून तो शेतकऱ्यांच्या हस्ते पार पडणार आहे. या सोहळ्याला तमाम शिव-शंभू भक्तांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे. गेली नऊ वर्षे शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने रायगडावर विविध संकल्पनांच्या माध्यमातून शिव-शंभूराजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा केला जात आहे. यंदा पोशिंदा राजा या संकल्पनेवर सोहळ्याचे आयोजन केले असून कृषी क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांच्या हस्ते राज्याभिषेक होणार आहे, अशी माहिती समोर आली आहे. या सोहळ्याची जोरदार तयारी सुरू आहे.

## अंतरंग

पनवेलमधील ३६ मंदिरांत होणार रामनामाचा जप/२
महाडमध्ये प्रेमसंबंधातून तरुणाची आत्महत्या/५
बैलगाडी स्पर्धेसाठी आता प्रांताधिकारी देणार परवानगी/७

# आज नमो खारघर मॅरेथॉन; एक धाव महिला नेतृत्वाखालील विकासासाठी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि खारघर रेसिडन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक धाव महिला नेतृत्वाखालील विकासासाठी हे महिलांप्रती आदरभावना अधोरेखित करणारे घोषवाक्य घेऊन नमो खारघर मॅरेथॉन २०२४ ही स्पर्धा रविवारी (दि.१४) होणार आहे. या अनुषंगाने खारघर धावणार आहे.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय भरारी व देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार

### माण्यवरांची लाभणार स्पर्धेला उपस्थिती




संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा होणार आहे. त्यानुसार पनवेल विधानसभा क्षेत्रात विविध कला व क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. त्या अंतर्गत रविवारी सकाळी ५ वाजता नमो खारघर मॅरेथॉन होणार आहे. या स्पर्धेला खारघर सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून सुरुवात होईल.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या होणाऱ्या मॅरेथॉनला प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, तर सन्माननीय उपस्थिती म्हणून आमदार महेश बालदी, प्रवासी संघाचे (एनजीओ) अध्यक्ष तरुण राठी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सेलिब्रिटी जया जुगल परमार यांची उपस्थिती लाभणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली २००६ साली पनवेल मॅरेथॉनच्या अनुषंगाने या स्पर्धेला प्रारंभ झाला. प्रथम आयोजनापासून ते आजपर्यंत उत्तम व नेटक्या आयोजनामुळे स्पर्धा उत्तरोत्तर यशस्वी होत गेली. (पान २ वर..)

# लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त महारोजगार मेळावा

## १२०० उमेदवारांना मिळाली रोजगार-स्वयंरोजगाराची संधी




**नवी मुंबई : बातमीदार**

भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहात शनिवारी (दि. १३) महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी तब्बल १२०० उमेदवारांना रोजगार-स्वयंरोजगाराची संधी प्राप्त झाली, तर ३००पेक्षा अधिक युवकांनी स्टार्टअपसाठी नोंदणी करून उद्योग सुरू करण्याच्या दिशेने माहिती घेत पहिले पाऊल टाकले. केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री पाटील यांच्या हस्ते तरुणांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मंडळ आणि गणेश नाईक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. माजी खासदार संजीव नाईक यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. मेळाव्यास माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी खासदार लोकनेते

### ३००पेक्षा अधिक युवकांनी केली स्टार्टअपची नोंदणी

रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते दशरथ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, जयवंत सुतार तसेच कौशल्य विकास, सिडको, एमआयडीसी, एमएसएमइ, स्टार्टअप, विमानतळ संलग्न कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी, विमानतळाच्या अनुषंगाने महारोजगार मेळावा आयोजनातून डॉ. संजीव नाईक यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाची झलक दिसते, असे गौरवोद्गार काढले. (पान २ वर..)






**पनवेल :** लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम वेगाने सुरू असून केंद्रीय हवाई उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी शनिवारी या विमानतळाची पाहणी करून आढावा घेतला. या वेळी केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील आणि उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेतली. समितीचे कार्याध्यक्ष माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जे.डी.तांडेल, उरण-पनवेल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष अतुल पाटील, भाजप ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष राजेश गायकर आदी उपस्थित होते. या वेळी मंत्री सिंधिया यांनी पत्रकार परिषद घेऊन विमानतळाच्या कामांसंदर्भात सविस्तर माहिती दिली.

## महायुतीचे आज राज्यभर मेळावे

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीतील ११ घटक पक्षांचे रविवारी (दि.१४) राज्यभर जिल्हावार मेळावे होणार आहेत. या मेळाव्यांना भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीसह इतर घटक पक्षांचे नेते उपस्थित राहणार आहेत.



मकरसंक्रांतीच्या पर्वावर राज्यातील ३६ जिल्ह्यांत ११ पक्षांचे संयुक्त मेळावे होणार आहेत. जिल्हा मेळाव्यांना घटक पक्षांचे जिल्हा पातळीवरील प्रमुख नेते, पालकमंत्री तसेच घटक पक्षांनी नेमलेले संपर्कमंत्री उपस्थित राहणार आहेत. जिल्हास्तरीय मेळाव्यानंतर तालुका आणि बूथस्तरीय मेळावे घेण्याचा निर्णय महायुतीने घेतला आहे. राज्यात महायुतीचे ४५पेक्षा अधिक उमेदवार विजयी करण्याचा निर्धार महायुतीतील घटक पक्षांनी केला आहे.

जिल्हावार मेळाव्यांनंतर फेब्रुवारीमध्ये विभागीय स्तरावर मेळावे होणार असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सर्व मंत्री, घटक पक्षांतील नेते या मेळाव्यांना उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यांना रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले, महादेव जानकर, शिवसंग्रामच्या ज्योती मेटे, विनय कोरे, जयदीप कवाडे, सुलेखा कुंभारे आदी उपस्थित राहणार आहेत.

विकासपुरुष नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान करण्याचा निर्धार भाजप व सहकारी पक्षांनी केला आहे. देशात अबकी बार ४०० पार, फिर एक बार मोदी सरकार अशी घोषणा देण्यात आली आहे, तर राज्यातून ४५+चे लक्ष्य महायुतीने ठेवले आहे.

## ज्येष्ठ शास्त्रीय गायिका प्रभा अत्रे यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**



ज्येष्ठ शास्त्रीय गायिका प्रभा अत्रे यांचे शनिवारी (दि.१३) पुण्यातील राहत्या घरी निधन झाले. वयाच्या ९२व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पहाटे झोपेतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्याआधीच त्यांचे निधन झाले होते.

प्रभा अत्रे या किराणा घराण्याच्या गायिका होत्या. संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल केंद्र सरकारने त्यांचा पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण अशा अनेक पुरस्कारांनी सन्मान केला आहे. त्यांच्या निधनाने संगीतक्षेत्रात शोक व्यक्त होत आहे. अत्रे यांचे नातेवाईक अमेरिकेत असल्याने ते आल्यावर अंत्यसंस्कार होतील.

## नमो खारघर सायक्लोथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद




(छाया : संकेत भोईर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल आणि खारघर रेसिडेन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही नमो खारघर मॅरेथॉन रविवारी (दि. १४) आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर प्री-इव्हेंट म्हणून १५ किलोमीटर नमो खारघर सायक्लोथॉन शनिवारी (दि.१३) झाली. या स्पर्धेचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या हस्ते झेंडा दाखवून झाला. स्पर्धेला सायकलप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विशेष म्हणजे या स्पर्धेत आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर सहभागी झाले होते. या वेळी माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, खारघर महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, खारघर रेसिडेंट वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अमर उपाध्याय, भाजप नेते प्रभाकर जोशी, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, प्रज्ञा प्रकोष्टच्या जिल्हा संयोजिका गीता चौधरी, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, (पान २ वर..)



# जगाला हेवा वाटावा असा विकसित महाराष्ट्र घडविणार -मुख्यमंत्री शिंदे

**पालघर : प्रतिनिधी**

प्रतिनिधी राज्यातील सर्व समाज घटकांना न्याय देऊन राज्य विकासाकडे वाटचाल करीत आहे. जगाला हेवा वाटावा, असा विकसित महाराष्ट्र घडविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.




विरार येथील वि.वा. ठाकूर महाविद्यालयात १९वे जागतिक मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. संमेलनास जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, आमदार सर्वश्री हितेंद्र ठाकूर, क्षितिज ठाकूर श्रीनिवास वनगा, राजेश पाटील, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, वसई-विरार महापालिकेचे आयुक्त अनिल पवार, संमेलनाचे अध्यक्ष, जपानमधील मराठी आमदार योगेंद्र पुराणिक, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे आदी उपस्थित होते.

कामानिमित्त किंवा व्यवसायानिमित्त जगामध्ये कुठेही मराठी माणूस स्थायिक झाला असेल तरी त्यांची नाळ ही मराठी भाषा व महाराष्ट्राशी जोडलेली असते याचे उत्तम उदाहरण म्हणजे जपानमधील मराठी भाषिक आमदार योगेंद्र पुराणिक हे आहेत. काळाबरोबर अनेक शब्दांचा संचय मराठी भाषेमध्ये समाविष्ट झाला. शेकडो वर्षापासून मराठी भाषेची मूळे सामान्य जनतेच्या मनामध्ये घट्ट रुजलेली आहेत हे सर्वांना अभिमानाचे असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झालेला शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू हा पर्यावरणपूरक प्रकल्प असून तो वरळी, कोस्टल हायवे, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे, मुंबई-गोवा हायवे तसेच वसई-विरार-अलिबाग मल्टी मॉडल कॉरिडॉर या मार्गाला जोडण्यात येणार आहे. प्रगत तंत्रज्ञानाचा आधार घेऊन मुंबई-पुणे मिस्सिंग लिंक हा जगातील सर्वांत जास्त रूंदीचा बोगदा तयार होत आहे. या बोगद्यामुळे पुण्याचे अंतर हे ३० मिनिटांनी कमी होणार आहे. वर्सोवा सी ब्रिजची जोडणी पालघर जिल्ह्यातील विरारपर्यंत वाढविण्यात आली असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्र ही संत, साहित्यिक, कविवर्य, कलाकारांची भूमी असून या सर्व महान व्यक्तींनी मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी आपले अमूल्य योगदान दिले आहे. यामुळेच आपली मराठी भाषा भक्कम पायावर उभी आहे व जगभर मराठी भाषेचा प्रसार होतांना आपल्याला दिसत आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्र शासनाने पहिले विश्व मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते.

या संमेलनाला जगभरातील मराठी बंधू-भगिनीचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या वर्षीदेखील विश्व मराठी साहित्य संमेलन, वाशी येथे आयोजित करण्यात येणार आहे. या संमेलनामुळे मराठी भाषेचा प्रसार जगभर होण्यास मदत होणार आहे. गिरगाव चौपाटी येथे मराठी भाषा भवन उभारण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## कोकण विभागीय महसूल क्रीडा स्पर्धेचे महसूलमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**रत्नागिरी : प्रतिनिधी**



कोकण विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२३-२४चे उद्घाटन क्रीडाज्योत प्रज्वलित करून आणि रंगीत फुगे हवेत सोडून महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी विभागीय क्रीडा स्पर्धा भरवण्याची चांगली परंपरा महसूल विभागाने राखली आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष म्हणून उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत उपस्थित होते. या वेळी खासदार विनायक राऊत, आमदार भास्कर जाधव, महसूलचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, आयकर विभागाच्या आयुक्त डॉ. माधवी आर. एम., विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले (मुंबई उपनगर), राजेंद्र क्षीरसागर (मुंबई शहर), किशोर तावडे (सिंधुदुर्ग), पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी (रत्नागिरी), मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार आदी उपस्थित होते.

महसूलमंत्री विखे-पाटील म्हणाले, यजमानपद मिळालेल्या रत्नागिरी जिल्ह्याने खूप चांगले आयोजन केले आहे. त्याबद्दल जिल्हाधिकारी आणि त्यांच्या टीमचे अभिनंदन! अशा स्पर्धांमधून विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची एकमेकांशी ओळखी होतील. त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळेल, असे सांगून त्यांनी या तीन दिवसीय होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

पालकमंत्री सामंत म्हणाले, पालकमंत्री म्हणून या जिल्ह्यात स्पर्धेच्या निमित्ताने आलेल्या सर्वांचे स्वागत करतो. महाराष्ट्राला विकासात्मक दृष्टीने पुढे नेणे हाच महसूल विभागाचा उद्देश आहे. महसूल आणि पोलीस खात्याला शासनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते महत्त्व असेच टिकवून ठेवावे. याच या निमित्ताने शुभेच्छा देतो.

आमदार जाधव यांनी महसूल विभागाने देशाची यंत्रणा मजबूत केल्याचे सांगून रत्नागिरी जिल्ह्याला प्रथम क्रमांकाचा सन्मान मिळावा, अशा शुभेच्छा दिल्या.

विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर म्हणाले, महसूल विभाग वेगवेगळ्या पद्धतीची कामे वर्षभर करीत असतो. या स्पर्धांच्या निमित्ताने या जिल्ह्यातून नवचैतन्य घेऊन आपापल्या जिल्ह्यात चांगले काम करू. गुणांना वाव देऊ. हिरीरिने काम करू हाच या क्रीडा स्पर्धांचा उद्देश आहे. त्या यशस्वी करू.

जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविकेत क्रीडा स्पर्धेबाबत सविस्तर माहिती दिली. 'नासा' व 'इस्रो'साठी पात्र ठरलेल्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा या वेळी भेट वस्तू देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवप्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. खेळाडूंनी संचलन करुन मानवंदना दिली. यानंतर खेळाडूंना प्रांताधिकारी अजित थोरबोले यांनी शपथ दिली.

## श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त पनवेलमधील ३६ मंदिरांत होणार रामनामाचा जप

### विश्वस्तांच्या बैठकीत निर्णय



**पनवेल : वार्ताहर**

श्रीराम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त १५ ते २२ जानेवारीदरम्यान पनवेलमधील ३६ मंदिरांमध्ये रामनाम जप करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्व मंदिरांच्या विश्वस्तांची बैठक झाली.

अयोध्या येथील भव्य श्रीराम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा निर्विघ्न संपन्न व्हावा याकरिता श्री रामनाम सामूहिक जप संकल्प समिती पनवेल तर्फे पनवेलमधील ३६ मंदिरांमध्ये १५ ते २२ जानेवारीदरम्यान रोज संध्याकाळी सात ते साडेसात सामूहिक श्रीराम नाम जपाचे आयोजन केले आहे. त्याकरिता पनवेल मधील मंदिरांच्या विश्वस्तांची सीकेपी समाजाचे श्री लक्ष्मी नारायण मंदिरात बैठक आयोजित केली होती. या बैठकीला सर्व मंदिरांचे विश्वस्त मोठ्या उत्साहामध्ये सहभागी झाले होते.

पनवेलमधील नागरिकांनी आपल्या घराजवळील मंदिरामध्ये जाऊन संध्याकाळी सात ते साडेसात या वेळेत होणाऱ्या रामनाम जपात सहभागी व्हावे व रामनाम सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



**पनवेल : अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूच्या लोकार्पण सोहळ्याला शहरातील रोज बाजार आणि कोळीवाडा येथील सर्व विक्रेते उपस्थित होते. डोक्यावर टोपी व हातात झेंडे घेऊन त्यांनी आपला आनंद व्यक्त केला.**

## मंगळसूत्र हिसकावणारे चोरटे नागरिकांच्या सतर्कतेने ताब्यात

**धाटाव : प्रतिनिधी**

चणेरा येथे जातअसलेल्या महिलेच्या चालत्या दुचाकीवरून मंगळसूत्र हिसकावून पळ काढणाऱ्या पुण्यातील मुळशीच्या तीन चोरट्यांना त्या ठिकाणी नागरिकांच्या सतरकेमुळे पकडण्यात आले त्यानंतर या ठिकाणावर हा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले, मात्र या घटनेने परिसरात चांगलीच घबराट पसरलेली आहे.

रोहा पोलिसांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार १२ जानेवारी दुपारी ४चा दरम्यान रोहा रेवदंडा रस्त्यावरील खुटल गावातून फिर्यादी संगीता दिलीप महाले (वय ४८) ही महिला चनेरा येथे जात होती. बंटी केंद्रे यांच्या घरासमोर रोहा बाजूकडून दुचाकीवर येणाऱ्या तीन व्यक्तींनी संगणमताने ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने एकसरी मंगळसूत्र आणि त्याचबरोबर असलेले काळे पिवळे मणी असे किमान पाच ग्रामचे मंगळसूत्र जबरदस्ती हिस्कवले.

मागून पळ काढला या ठिकाणी फिर्यादी संगीता महाले यांनी त्यांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्या तिघांपैकी दुचाकीवर मागे बसलेल्या एकानेहाताने धक्का दिल्याने त्या रस्त्यावर खाली पडल्या त्यांच्या कमरेला मुका मार बसला असून मंगळसूत्र असताना मानेजवळ जखम झाली आहे, अशी माहिती रोहा पोलिसांनी दिली आहे.

## स्वच्छ भारत अभियानांतर्गत माणगाव शहराला ओडीएफ प्लस मानांकन

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत केंद्र सरकार कडून राबिविण्यात येत असलेल्या स्वच्छ सर्वे क्षणात यशस्वीपणे प्रमाणित होऊन माणगाव शहराने ओडीएफ प्लस मानांकन मिळवले आहे.

माणगाव शहराने शौचमुक्त शहर म्हणून आपले सातत्य टिकवण्यात यावर्षी यश मिळवले आहे. असे शहर ज्यात व्यक्ती उघड्यावर शौचास जाण्यास प्रतिबंधीत आहे. सर्व शहरवासीयांना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. शहरात सर्व सामुदायिक तथा सार्वजनिक शौचालायापैकी २५ टक्के शौचालय सर्वोत्तम दर्जाची आहेत.

शहरात निर्माण होणाऱ्या सर्व मैला साठीचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. शहराचा स्वताचा स्वतंत्र मैला व सांडपाणी प्रकल्प कार्यान्वित करण्यात येत आहे. शहरातील सर्व सार्वजनिक शौचालये गुगल नकाश्यावर (एसबीएम शौचालय) नोंदणीकृत आहेत. वरील निकषांचे मुल्याकन करण्यासाठी केंद्रीय पथकाने माणगाव शहराला ऑगस्ट-सप्टेंबर २०२३मध्ये शहरात अचानक धडक दिली होती. त्यांनी शहरातील सर्व परिसरांची तसेच सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालये आणि सांडपाणी प्रकल्पांचे मुल्याकन करण्यात आले. त्यानंतर या पथकाद्वारे केंद्राकडे अहवाल सादर करण्यात आला होता.

माणगाव नगरपंचायतने केलेले काम व शौच मुक्त शहराचा दर्जा टिकवण्यासाठी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, स्वच्छता व आरोग्य समिती सभापती, स्वच्छता सभापती, सर्व नगरसेवक, नगरसेविका, मुख्याधिकारी, अभियंता, सिटी को ऑर्डीनेटर, मुकादम आणि सफाई कर्मचारी यांनी केलेले नियोजन कामी आले.

पान १ वरुन

## आज नमो खारघर मॅरेथॉन; मान्यवरांची लाभणार उपस्थिती

यापूर्वीच्या मॅरेथॉन स्पर्धा रन अगेन्स्ट एडस, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी, एक धाव आरोग्यदायी पनवेलसाठी, रन फॉर निर्भय भारत, सद्भावना दौड, एक धाव पाणीबचतीसाठी, स्त्री-भ्रूणहत्येविरोधात एक धाव, एक धाव महिलांच्या सन्मानासाठी, रन टू प्रमोट कॅशलेस ट्रान्झक्शन, हम फिट तो इंडिया फिट, एक धाव व्यसनमुक्तीसाठी अशी घोषवाक्य घेऊन यशस्वीरित्या उत्कृष्ट आयोजनाने यशस्वी झाल्या आहेत. यंदा एक धाव महिला नेतृत्वाखाली विकासासाठी ही थीम आहे.

सामाजिक व शारीरिक हित जोपासले जात उत्कृष्ट व सुयोग्य नियोजन आणि वेगवेगळ्या सामाजिक संदेशासाठी प्रसिद्ध असलेल्या या स्पर्धेने लोकप्रियतेची शिखरे गाठली आहेत. यंदाची ही स्पर्धा १४वी असून स्पर्धा पुरुष खुला गट १० किलोमीटर अंतर, महिला खुला गट १० किलोमीटर अंतर, १७ वर्षाखालील मुले गट पाच किमी अंतर, १७ वर्षाखालील मुली गट पाच किलोमीटर, १४ वर्षाखालील मुले गट पाच किमी अंतर, १४ वर्षाखालील मुली गट पाच किमी अंतर तसेच खारघर दौड गट तीन किलोमीटर आणि सिनिअर सिटीझन दौड दोन किलोमीटर अशा आठ गटांत होणार असून या स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे.

या स्पर्धेचा क्रीडारसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे चेअरमन परेश ठाकूर, जनरल सेक्रेटरी वाय.टी. देशमुख, खारघर भाजपचे अध्यक्ष प्रवीण पाटील, खारघर रेसिडन्स वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष अमर उपाध्याय, चेअरमन ब्रिजेश पटेल यांनी केले आहे.

**- बक्षिसांचा तपशिल -**

*पुरुष खुला गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर १० किलोमीटर : प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये, तृतीय क्रमांक १० हजार रुपये, उत्तेजनार्थ सात स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये तसेच सर्व विजेत्यांना ट्रॅक सूट.*

*महिला खुला गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर १० किलोमीटर : प्रथम क्रमांक २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक १५ हजार रुपये, तृतीय क्रमांक १० हजार रुपये, उत्तेजनार्थ सात स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये तसेच सर्व विजेत्यांना ट्रॅक सूट.*

*१७ वर्षाखालील मुले गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*

*१७ वर्षाखालील मुली गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*

*१४ वर्षाखालील मुले गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*

*१४ वर्षाखालील मुली गट (फक्त रायगड जिल्हा) अंतर पाच किलोमीटर : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच दहा उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*

*विशेष आकर्षण खारघर दौड (अंतर तीन किलोमीटर) : स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक मेडल.*

*सिनिअर सिटीझन दौड (अंतर दोन किलोमीटर) : प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय क्रमांक तीन हजार रुपये, तृतीय क्रमांक दोन हजार रुपये तसेच सात उत्तेजनार्थ स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये.*

## लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त महारोजगार मेळावा

दिघा गाव रेल्वेस्थानक सुरू करण्यासाठी नाईक यांनी केंद्रीय स्तरावर केलेल्या अविरत पाठपुराव्याचाही त्यांनी या वेळी उल्लेख केला.

माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी युवकांना उद्योजक बनण्याचा सल्ला देऊन एक शिक्षक ते उद्योजक म्हणून स्वतःची प्रगती कशी साधली याची माहिती दिली.

आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबई विमानतळाच्या अनुषंगाने लक्षावधी नोकरीच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, देशामध्ये १५ लाख कोटी गुंतवणूक डेटा सेंटर उद्योगांमध्ये होणार आहे. त्यापैकी पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक नवी मुंबई क्षेत्रात होईल.

माजी खासदार संजीव नाईक यांनी प्रास्ताविकात स्थानिक आणि प्रकल्पग्रस्तांच्या हितासाठी लोकनेते दि. बा. पाटील यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांना कृतिशील अभिवादन देण्यासाठी महारोजगार मेळाव्याचे आयोजन केले असल्याचे सांगितले.

भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनीा या महारोजगार मेळाव्यात स्टार्टअपबद्दल उपयुक्त मार्गदर्शन झाले असून विमानतळाच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या अन्य रोजगारांच्या संधींची माहिती प्रकल्पग्रस्तांसह स्थानिक उमेदवारांना मिळाल्याचे नमूद केले.

## नमो खारघर सायक्लोथॉनला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

अजय माळी, राजेंद्र मांजरेकर, शैलेंद्र त्रिपाठी, अक्षय लोखंडे, चेतन नवघरे, शोभा मिश्रा, निर्मला यादव, मधुमिता जेना, नीलम विसपुते, स्नेहल बोधाई, निर्मला यादव, सुशीला शर्मा, प्रवीण बेरा, निखिल काकडे, आदित्य हातगे, दुर्गा बन्सल, किरण रावडे, सर्जेराव मेंगाणे, संदेश वाडीकर, मयुर तायडे, अनिकेत पाटील, हार्दिक पटेल, शशांक त्रिपाठी, शुभ पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेतील स्पर्धकांचा उत्साह पाहून खारघरसह संपूर्ण पनवेल आणि नवी मुंबई नमो खारघर मॅरेथॉनसाठी सज्ज असल्याचे दिसून आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# ‘दिबां’ची चळवळ पुढे नेऊया

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे जासईत प्रतिपादन




**उरण, नवी मुंबई : प्रतिनिधी, वार्ताहर**

केवळ रायगड, ठाणेच नव्हे; तर संपूर्ण राज्यातील स्थानिक जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी लढणारे भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दि.बा.पाटील हे असामान्य नेतृत्व होते. एक चालती बोलती चळवळ असणारे ‘दिबां’चे विचार नव्या पिढीचे अस्तित्व टिकविण्यासाठी नेहमी प्रेरणादायी ठरणार असून यापुढेही स्थानिकांच्या न्याय्य हक्कांसाठी आपण सर्वांनी ‘दिबां’नी उभारलेली चळवळ पुढे नेऊया, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी (दि. १३) जासई येथे केले.

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दशरथ भगत यांच्या पुढाकाराने आयोजित दि.बा.पाटील चळवळ या विषयावरील द्वितीय चरणातील स्पर्धेच्या विजेत्यांचा गुणगौरव व स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळा-महाविद्यालयांतील समर्पित शिक्षकांचा सन्मान सोहळा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘दिबां’चे जन्मगाव जासई येथे झाला. त्या वेळी ते बोलत होते.

लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून जासई येथील मंगल कार्यालय सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते महेंद्र घरत, सुरेश पाटील, भूषण पाटील, ‘दिबां’चे पुत्र अतुल पाटील, आयोजक दशरथ भगत, संदीप भगत, सरपंच संतोष घरत, उपसरपंच माई पाटील, राजेश गायकर, विनोद म्हात्रे, सीमा घरत, वैजयंती भगत, फशीताई भगत आदींसह नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून अध्यक्ष दशरथ भगत यांनी आयोजित केलेली ही स्पर्धा कौतुकास्पद असल्याचे सांगून समाजाच्या हितासाठी आपण सर्वांनी ‘दिबां’सारखे लढवय्येपणे उभे राहिले पाहिजे, असे लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले.

दि.बा.पाटील यांनी सुरू केलेली स्थानिकांच्या न्याय्य हक्कांची ही लढाई चालू राहण्यासाठी त्यांचे विचार नव्या पिढीत रूजविले पाहिजेत. त्यांची ही चळवळ पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे उद्गार स्पर्धेचे आयोजक तथा नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दशरथ भगत यांनी काढले. इतर मान्यवरांनीही विचार मांडले. या वेळी विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विद्यालयातील प्रदर्शनाचे उद्घाटन

## लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामाठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे शनिवारी (दि. १३) कला, विज्ञान आणि गणित शाखेद्वारे प्रदर्शन भरविले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या उद्घाटन सोहळ्यात आमदार प्रशांत ठाकूर, स्कूल कमिटी सदस्य राजेश गायकर, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय निरीक्षक रोहिदास ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, रयत शिक्षण संस्था रायगड विभाग पी.आर.ओ. बाळासाहेब कारंडे, हेड क्लर्क गुर्जर सर तसेच पी. टी.ए. एक्झिक्यूटिव्ह कमिटी सदस्य उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांचे कौतुक**

**आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून करून विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर यशस्वी होण्यासाठी प्रोत्साहित केले.**

या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व एक पात्री नाटकाद्वारे विविध वैज्ञानिक व गणिततज्ज्ञ यांची वेशभूषा करून त्यांनी केलेल्या संशोधनाचे वर्णन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व भेटकार्ड देऊन स्वागत केले.

या प्रदर्शनासाठी परीक्षक स्वाती काळे (सीकेटी विज्ञान विभाग), मंजुषा भगत (सीकेटी गणित विभाग) यांनी प्रदर्शनातील प्रतिकृती व विद्यार्थ्यांचे स्पष्टीकरण याद्वारे परीक्षण केले. या सोहळ्यास पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प्रिन्सिपलअविनाश कुलकर्णी, कॉर्डिनेटर सोनाली मॅडम, अर्चना माथुर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.







उरण : दि.बा.पाटील चळवळ या विषयावरील द्वितीय चरणातील स्पर्धेच्या विजेत्यांचा गुणगौरव व स्पर्धेत सहभागी समर्पित शिक्षकांचा सन्मान सोहळा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत जासई येथे झाला. या वेळी कविता विनायक मुंबईकर (लेख स्पर्धा, उत्तेजनार्थ) व वल्लरी विनायक मुंबईकर (छायाचित्र संग्रह) यांना गौरविण्यात आले.



**पनवेल : क्वीन डिझायनर या आर्ट स्टुडिओचे उद्घाटन माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते झाले. या वेळी इंदूमती हुद्दार, ललिता हुद्दार, सुनिता हुद्दार, मेघा हुद्दार, रचना हुद्दार, रेश्मा भोईर, सुनिता म्हात्रे, शिवानी म्हात्रे आदी उपस्थित होते. या स्टुडिओमध्ये फॅशन डिझायनिंग, नेल आर्ट, रेसिन आर्ट, हूप एम्ब्रॉयडरी, आरीवर्क करण्यात येणार आहे.**

# पनवेल नवनाथ नगर परिसरात विद्युत हायमास्ट

## भाजप पदाधिकाऱ्यांचा यशस्वी पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यामुळे पनवेल नवनाथ नगर रेल्वे स्टेशन रोड येथे रस्त्यावर विद्युत हायमास्ट बसविण्यात आले आहेत. भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात व उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर यांच्या पाठपुराव्यामुळे महापालिकेने हे हायमास्ट बसविले आहेत.

रात्रीच्या वेळेस या रस्त्यावर अंधार असल्यामुळे लहान मुलांना, महिलांना, नागरिकांना आणि रेल्वे प्रवाशांना अंधाराचा सामना करावा लागत होता. रावसाहेब खरात यांनी पत्रव्यवहार करून पनवेल महापालिकेकडे सतत पाठपुरावा केला. महापालिकेने याची दखल हायमास्ट बसविले.

पनवेल रेल्वे स्टेशन रोड येथे, नवनाथ नगर वसाहत गल्लीमध्ये, भगत चाळ रस्त्यावर आणि शिवाजी नगर वसाहत रस्त्यावर नवीन लाईटचे पोल लावण्यात आले आहेत. स्थानिक नागरिकांनी आणि रेल्वेने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांनी रावसाहेब खरात व राहुल वाहुळकर यांचे आभार मानले.

या वेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर मंडल सदस्य आनंद जाधव, विजय झिरे, गोपाल पट्ठे, राजू बिल्लाव, अमोल लहाने, राजू झिरे, उमेश कांबळे, माले मोर्य, सर्जेराव साळवे, अनिकेत खरात, सनी साळवे, अजय जाधव, गणेश जाधव आदी उपस्थित होते.



# गव्हाण विद्यालयात भव्य नमो चषक चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप जनता युवा मोर्चाच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश पातळीवर भव्य नमो चषक २०२४ चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये पाचवी ते नववी अखेर सर्व विद्यार्थ्यांसाठी भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही माहिती विद्यालयाच्या कला विभागप्रमुख गणेश भोईर यांनी सांगितले.

वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन सोमवारी (दि. १५) करण्यात आले असल्याची माहिती विद्यालयाच्या वक्तृत्व स्पर्धा विभागाचे प्रमुख सागर रंधवे यांनी सांगितले. भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने महाराष्ट्रात कला व सांस्कृतिक महोत्सवाच्या आयोजन करण्यात आले असून त्यानिमित्त नमो चषक २०२४ अंतर्गत भव्य चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांच्या आयोजन करण्यात आल्याची माहिती शिक्षक सेलचे नेते आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ नंबर व जनरलवाडी सदस्य रवींद्र भोईर यांनी दिली.



शनिवारी विद्यालयामध्ये पाचवी ते नववी अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.या स्पर्धेदरम्यान भारतीय जनता पार्टी शिक्षक सेलचे नेते संजय भगत यांनी विद्यालयास भेट दिली व चित्रकला स्पर्धेचे निरीक्षण केले. या वेळी त्यांच्यासमवेत शिक्षक नेते व मुख्याध्यापक लखीचंद ठाकरे, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रणिता गोळे, उपशिक्षक देवेंद्र म्हात्रे, द्रौपदी वर्तक, ज्युनिअर कॉलेजचे उमेश पाटील व इतर शिक्षक उपस्थित होते.

नमो चषक २०२४ अंतर्गत भव्य चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आकर्षक व रोख रकमेची बक्षिसे देण्यात येणार असून सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षक सेलचे नेते संजय भगत यांनी दिली.

# जासई विद्यालयात लोकनेते ‘दिबां’ची जयंती उत्साहात



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील जुनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई या विद्यालयात आदरणीय लोकनेते दि. बा. पाटील यांची जयंती मोठ्या उत्साहात झाली.

विद्यालय परिसरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना व हुतात्मा स्मारकाला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून लोकनेते दि.बा. पाटील साहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पालखीतील प्रतिमेचे पूजन विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कामगार नेते सुरेश पाटील, विद्यालयाचे चेअरमन अरुणशेठड जगे, जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत, दि.बा. पाटील साहेबांचे सुपुत्र अतुल पाटील, अविशेठ पाटील, नरेश घरत इत्यादींनी केले पालखी मिरवणूक लेझीमच्या पथकाने उत्साहात संपूर्ण जासई गावातून काढण्यात आली.

या वेळी व्हाईस चेअरमन डी. आर. ठाकूर, बाबुराव मढवी, गोपीनाथ ठाकूर, यशवंत घरत, विनोद म्हात्रे, गोपी म्हात्रे, सुभाष घरत, माई म्हात्रे, विद्यालयाचे प्राचार्य संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील, रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, गुरुकुल प्रमुख ठाकरे सर, दहागाव परिसरातील ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

विद्यालयातील सर्व सेवक वर्ग आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात दि. बा. पाटील साहेबांच्या जयंतीचा कार्यक्रम मोठ्या झाला.

# झोपडपट्टीतील शाळेत लोकनेते दि. बा. पाटील यांची जयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

शेतकऱ्यांचे कैवारी लोकनेते दि. बा. पाटील यांची९८ वी जयंती उरण तालुक्यातील सावित्रीबाई फुले झोपडपट्टीतील बाल संस्कार मंदिर शाळेत भाजपचे उरण तालुका चिटणीस रायगड भूषण नरेश म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.



या वेळी समाज सेवक नारायण तांडेल, समाज प्रबोधन शिक्षण संस्थेचचे सचिव रवींद्र म्हात्रे, रंजना तांडेल, माजी मुख्याध्यापक शशिकांत म्हात्रे, अ‍ॅड. श्रध्दा तांडेल, केतन तांडेल आदी उपस्थित होते. या वेळी सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शाळेतर्फे अभिनंदन करण्यात आले. या वेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवून रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमास झोपड पट्टीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एक कोटीची 'तलाश' शून्यावरच बाद

**झूम प्रहर**

**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक






तुम्हाला एक प्रश्न विचारतो, १९७०च्या जानेवारी महिन्यात गिरगावातील चाळीतील मध्यमवर्गाच्या एकत्र कुटुंब पद्धतीत (आजी, आजोबा, पती, पत्नी व तीन लहान मुले) कुटुंब प्रमुखाला महिन्याला किती रुपये पगार चांगले सुख देणारा होता असे तुम्हाला वाटते? एक लक्षात घ्या, घरात मनोरंजनासाठी फक्त छोटासा ट्रान्झिस्टर आहे (बटनाने कमी, पण फटका मारल्यावर तो चांगला चालतो), तोपर्यंत दूरचित्रवाणी हा शब्दच माहीत नव्हता. त्यामुळे त्याची गरज नव्हतीच. घरात लॅण्डलाईन फोन, एअर कंडिशनर, फ्रीज, मिक्सर, ज्यूसर, गिझर, वॉशिंग मशीन या चैनीच्या वस्तू गरजेच्या नव्हत्या. संपूर्ण दोन-तीन चाळीत एक फोन भारी वाटे. जेवणासाठी हॉटेलमध्ये जायचे असते हा विचारही मनात येत नसे. महिन्यातून एकदा मॅजेस्टीक थिएटरमध्ये स्टॉलचे पासष्ट पैशांचे तिकीट काढून मराठी चित्रपट घरचा डबा घेऊन जाऊन सहकुटुंब पाहिला जात असे...

या सगळ्याची गोळाबेरीज महिना तीनशे-साडेतीनशे रुपयांत छान जमून जाई. (तुमच्या कुटुंबात, नात्यात कोणी सत्तरीपार वयाचे असल्यास हवं तर त्यांना विचारा याबाबत)

अशा आर्थिक स्थैर्याच्या काळात एखाद्या हिंदी चित्रपटाच्या निर्मितीचे बजेट तब्बल एक कोटी? त्याच सुमारास कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट मराठी चित्रपट लाख सव्वा लाखात बने. हिंदी चित्रपटही पंचवीस=तीस लाखांत निर्माण होई. एखादा 'मेरा नाम जोकर' (१९७०) अपवाद. त्यातही राज कपूरचा मंत्र असे पिक्चर दिलसे बनती है, पैसेसे नही. त्या काळात 'पै पै मोजूनमापून अथवा वाचवून नि वाढवूनही चित्रपट निर्मिती होत नसे. पब्लिकला झक्कास मनोरंजन द्यायचे, गीत संगीत व नृत्य भारी असावे अशीच हिंदी चित्रपट निर्मितीमागची भावना असे.

अशातच अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक ओ. पी. रल्हन आपण 'एक कोटी खर्चाचा चित्रपट तलाश'ची निर्मिती केली आहे, असं पिक्चरचं शूटिंग संपल्या संपल्या चित्रपटाच्या पूर्वप्रसिद्धीत जोरशोरसे सांगू लागताच चित्रपट रसिकांच्या भुवया उंचावणारच. समाजाच्या सर्वच स्तरात नातेसंबंधाची वीण घट्ट असल्याचा तो काळ होता. जगण्यासाठी पैसा हा फक्त आधार आहे, त्यासाठी अचाट, अफाट संपत्तीची भूक नाही असे मानले जात असतानाच 'एक कोटीचा पिक्चर' असे विविध भारतावरील रेडिओ प्रोग्राममधून कानावर ('तलाश कहानी है उस लडकी की जिसे जिंदगी मे तलाश थी' असं या पिक्चरच्या रेडिओ प्रोग्राममध्ये डायलॉग होता हे आठवतेय), रस्त्यावरच्या दिव्याच्या खांबावरील पोस्टरवर, मुंबईतील मोक्याच्या ठिकाणच्या होर्डींग्सवर सतत दिसू लागल्यावर 'एक कोटीचा आकडा' जरा जास्तच मोठा वाटू लागला. त्या काळात मध्यमवर्गीयांच्या घरात नट-नट्यांची लफडी कुलंगडी चवीचवीने प्रसिद्ध करीत असलेल्या ग्लॉसी पेपरवरील गॉसिप्स मॅगझिनना प्रवेश नसे. सकाळी घरात येणारे वृत्तपत्र आणि वाचनालयातून आणले जाणारे पुस्तक वा साप्ताहिकातून 'पिक्चरच्या जगात' काय काय चाललंय ते समजायचं आणि ते पुरेसेही असे. अशातच 'एक कोटीचा पिक्चर' हे जरा अतीच वाटायचं. खरंतर पिक्चर किती रुपयांत बनतो आणि मग निर्माता त्यावर किती कमावतो असे आर्थिक प्रश्न त्या काळातील चित्रपट रसिकांच्या मनात येत नसत. पिक्चर आवडला तर डोक्यात घ्यायचा नि ठेवायचा आणि पडद्यावर न ठेवता डोक्यावर घ्यायचा एवढचं ठावूक असल्याचे ते दिवस होते.









राजेंद्रकुमार ज्युबिलीकुमार म्हणून ओळखला जात होता तरी याच दिवसांत राजेश खन्नाचे पिक्चर पडद्यावर येत ते ज्युबिली हिट व्हायला. त्याची फेव्हरेट नायिका शर्मिला टागोरचे एक मोठे स्वप्न पूर्ण होत होते. देव आनंद (यह गुलिस्ता हमारा), दिलीपकुमार (दास्तान) आणि आता राजेंद्रकुमार (तलाश) यांची नायिका व्हायचं तिचं मोठे स्वप्न पूर्ण होत होते. तेदेखील डबल रोलने. न इव्हिनिंग इन पॅरिस, यह रात फिर न आयेगी या चित्रपटात तिने तत्पूर्वीच (आणि मग 'मेरे हमसफर', 'राजा रानी', 'दो शत्रू', 'बेशरम', 'मौसम' इत्यादीत) तिचा डबल रोल. 'तलाश'मध्ये शहरी व ग्रामीण अशी दुहेरी भूमिका. चित्रपटात राजेंद्रकुमार व शर्मिला टागोर यांसह बलराज साहनी, ओ. पी. रल्हन, हेलन, सुलोचनादिदी, मदन पुरी, सप्रू, टूनटून इत्यादींच्या भूमिका. एका दृश्यात राजेंद्रकुमार ओ. पी. रल्हनला म्हणतो, काम पे दिल नहीं लगता, बॉस ने मुझे वार्निंग दी थी... यावर ओ. पी. रल्हन म्हणतो, वार्निंग नहीं तो क्या डार्लिंग देगा?

पिक्चरची भट्टी काही जमली नाही. प्रेमकथाच होती. गाणी मात्र एकदम सरस. मजरुह यांच्या गीतांना सचिन देव बर्मनचे संगीत. पलकों के पिछे तू ने (मोहम्मद रफी व लता मंगेशकर), कर ले प्यार (आशा भोसले), तेरे नैना तलाश कर ले (मन्ना डे), कितनी अकेली (लता मंगेशकर), आज को जुनली रात मा (लता मंगेशकर व मोहम्मद रफी) अशी अविट गोडीची छान गाणी ही अतिशय मोठी जमेची बाजू. त्यातही आज को जुनली... गाण्याबद्दल एक खास गोष्ट. त्यातील डान्सरमध्ये सुषमा शिरोमणी आहे म्हटलं. भुवया उंचावल्या ना? साठच्या दशकात शालेय वयातच सुषमाने चित्रपटात छोट्या मोठ्या भूमिका साकारणे, नृत्य गीतात सहभागी असणे याला सुरुवात केली आणि त्याच मेहनती वाटचालीत या नृत्य गीतात तिला संधी मिळाली.

ओ. पी. रल्हन चित्रपट क्षेत्रात येण्यापूर्वी रेल्वे स्टेशनवर पेपर विकायचा. पन्नास-साठच्या दशकात हिंदी चित्रपटातून छोट्या छोट्या भूमिका साकारत असतानाच दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांच्याकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून उमेदवारी सुरू केली. अतिशय धडपड्या, बडबड्या. त्यातूनच 'मुजरीम' (१९५८)पासून त्याने दिग्दर्शनात पाऊल टाकले. यात शम्मी कपूर, गीता बाली, रागिणी, शुभा खोटे यांच्या प्रमुख भूमिका. त्यानंतर गहरा दाग (१९६३. राजेंद्रकुमार व माला सिन्हा), फूल और पत्थर (१९६६. मीनाकुमारी व धर्मेंद्र), यानंतर मोठीच उडी घेऊन 'तलाश' आणि त्यानंतर 'हलचल' (१९७१), 'बंधे हाथ' (१९७३), 'पापी ' (१९७७) व 'प्यास ' (१९८२) या चित्रपटांची निर्मिती व दिग्दर्शन. धर्मेंद्रला 'फूल और पत्थर'च्या खणखणीत यशाने पहिला व्यावसायिक आधार मिळाला. मुख्य प्रवाहातील नायकाने उघड्या निधड्या छातीने दृश्य देणे तेव्हा मोठेच धाडसाचे. धर्मेंद्रच्या दणकेबाज प्रकृतीला ते शोभले आणि त्याच्या 'ही मॅन' इमेजचा जणू पाया रचला गेला. (तो १९७३ साली 'यादों की बारात'च्या यशाने घट्ट झाला.) असं असलं तरी 'फूल और पत्थर'च्या निर्मितीच्या काळात त्याचं व रल्हनचे संबंध बिघडले होते आणि अनेक वर्षांनंतर याच ओम प्रकाश रल्हनला श्रद्धांजली म्हणून वांद्र्यातील एका चौकाचे धर्मेंद्रच्या हस्ते नामकरण करण्यात आले. राजेंद्रकुमार व रल्हन खूपच जुने मित्र आणि कालांतराने रल्हनच्या बहिणीशी राजेंद्रकुमारचे लग्न झाले.

'तलाश' एक कोटींत निर्माण झाला याची प्रचंड हवा निर्माण झाली. ९ जानेवारी १९७० रोजी मुंबईत प्रदर्शित करण्यात आला. मुख्य चित्रपटगृह अप्सरामधील फर्स्ट शोपासूनच पब्लिकचा रिपोर्ट 'बकवास है' असा आला आणि पिक्चर पडला. श्रवणीय गाणीही पिक्चरला वाचवू शकली नाहीत...आणि तुम्हालाही माहित्येय, फ्लॉप पिक्चरची यथेच्छ टवाळी होते. कोणी म्हटलं, रल्हनची श (म्हणजेच राख), तर कोणी आणखी काही म्हटलं.

बराच काळ मग कोणी फिल्मवाल्याने 'पिक्चरच्या बजेटचा आकडा' पूर्वप्रसिद्धीत आणला नाही, खेळवला नाही. पिक्चरच्या अपयशाचा तो प्रचंड मोठा धक्का होता.

तब्बल दशकभरात कोणी काही म्हटलं नाही, कारण किती रुपयांत पिक्चर बनवला यापेक्षा त्यात काय दाखवलं ते बघू देत असा थेट मामला होता आणि मग १९८० साली जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान' आला. तेव्हा त्याच्या खर्चिक स्टाईलीश जाहिरातीत म्हटलं, 'सहा कोटींचा पिक्चर शान'... दहा वर्षांत सहापट आकडा.

---

# तपस्वी योगिनी जिजाऊ



**जिच्या हाती पाळण्याची दोरी,**
**तीच जगाची उद्धारी।**

राजमाता जिजाऊंनी शिवबाच्या पाळण्याची दोरी अशी हाती घेतली की, ज्यामुळे संपूर्ण मराठी मुलुख सुखाची स्वप्ने पाहू लागला. लेकीबाळी निर्धास्त झाल्या. शेतकरीराजा सुखावला. शिवारं भरल्या पिकांनी डोलू लागली. जगज्जननी आई अंबेचा जागर, गोंधळ व स्तुतिसुमने ताल धरू लागली. रामाच्या प्रहरी वासुदेव फेरी घालू लागले. स्वराज्याच्या गारव्यात पशू-पक्षी विसावा घेऊ लागले. उजाड झालेला मराठी मुलुख नवचैतन्याने बहरू लागला. स्वराज्यात प्रजा आनंदाने नाचू लागली. अशा या जिजामाता यांची जयंती नुकतीच साजरी झाली.

सतत परकीय आक्रमणामुळे अवघा मुलुख अस्ताव्यस्त झाला होता. बेवारस अपत्याप्रमाणे मुघलशाही, आदिलशाही, निजामशाही यांच्या अन्यायाखाली मराठी मुलुख चिरडून भरडून निघत होता. भरदिवसा लेकीबाळी पळविल्या जात होत्या. माळराने ओसाड पडली होती. शेतकरीराजा शेत सारा भरून कर्जाच्या ओझ्याने हवालदिल झाला होता. रयतेला कुणी वाली उरलाच नव्हता. मराठी माणूस स्व:ताशीच लढत होता. कधी मुघलशाही, कधी आदिलशाही, तर कधी निजामशाहीच्या बाजूने. देवालये उद्ध्वस्त झाली होती. गाभाऱ्यातील मूर्तींची विटंबना सुरू होती. संस्कृती लयाला चालली. मराठी अस्मिता संपलीच होती. रयत अन्यायाने होरपळून निघाली होती. अशी रयतेची हेळसांड आई भवानीला पाहवली नसावी म्हणून प्रत्यक्ष आई भवानीनेच जिजाऊंच्या रूपाने जन्म घेतला.

जिजाऊंचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंधखेडराजा येथे राजे लाखोजीराव व म्हाळसाबाईच्या शूरवीर, मातब्बर जाधव कुटुंबात झाला. लहानपणीच त्यांना घोडेस्वारी, तलवारबाजी, दांडपट्टा फिरविणे यांचे प्रशिक्षण मिळाले व त्या युद्ध कलांमध्ये पारंगत झाल्या. जाधव घराण्यातूनच त्यांना युद्धनीती, राजनीती, राज्यकारभार, सेवाभाव यांचे बाळकडू पाजले होते. रयतेची दु:खे जाणून घेऊन त्यांना त्या मदत करीत असत. सर्वांशी आदराने वागणे हा त्यांचा उत्तम गुण होता

आपल्या सर्वगुणसंपन्न बुद्धिमान मुलीचा विवाह तशाच बुद्धिमान, शूर, पराक्रमी युद्धकला निपुण मुलाशी झाला पाहिजे असे लखोजींना वाटणे साहजिकच होते आणि झालेही तसेच. वेरूळचे राजे मालोजीराव भोसले व उमाबाई भोसले यांचे सुपुत्र शहाजीराजे भोसले यांच्याशी जिजाबाईंचा विवाह झाला. शहाजीराजे भोसले हे महापराक्रमी कुशाग्र बुद्धिमत्ता, युद्धप्रसंगी कुशल नेतृत्व, उत्तम प्रशासन व स्वतंत्र्य राज्यकारभार असे विशेष गुणकौशल्य असलेले विचारी व्यक्तिमत्व होते. जिजाबाईंचा विवाह झाल्यानंतर भोसले घराण्याचे संस्कार, मूल्ये यांची त्यांनी जोपासनी केली. त्या उभयतांच्या मनात स्वराज्याचे वारे वाहू लागले. तसा प्रयत्न शहाजीराजांनी मुर्तजा निजामास मांडीवर घेऊन स्वत: सिंहासनावर बसण्याचा केला होता. त्यांनी तीन वर्षे उत्तम राज्यकारभार केला. म्हणजे स्वराज्याचा संकल्प घेतला. आता त्या संकल्पाला पूर्णत्व देण्याचे बाकी होते. म्हणूनच त्या उभयतांच्या पोटी शिवबांनी जन्म घेतला.

तो दिवस होता फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१. शुक्रवार १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवरायांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. संपूर्ण सृष्टी आनंदाने न्हाऊन निघाली, कारण जिजाऊंच्या पोटी एका युगपुरुषाने जन्म घेतला होता. काही काळ बेताचा गेला. पुढे शहाजीराजे विजापूरच्या सेवेत रूजू झाले. बालशिवाजी व जिजाऊ पुण्यात राहिल्या. पुणे म्हणजे शहाजीराजे यांची जहागिरी. पुण्यात राहून त्यांनी शिवबाला स्वराज्याचे बाळकडू पाजले. रामायण, महाभारत शिवबाला स्पष्ट करून सांगितले. आदर्श संस्काराबरोबरच त्यांनी शिवबाला घोडेस्वारी, दांडपट्टा फिरविणे, तलवारबाजी, युद्धकला इ. प्रशिक्षण दिले. काही निवडक विश्वस्त मंडळींना घेऊन त्यांनी स्वराज्याची मुहुर्तमेढ रोवण्यास सुरुवात केली. शिवबाला स्वराज्यासाठी प्रेरित करून राजा कसा असावा याचे प्रशिक्षण प्रसंगी शिवबाला बिकट परीस्थितीत ठेवून दिले. त्यांच्या प्रेरणेनेच केवळ आठ वर्षांचा शिवबा मुठभर मावळ्यांसह स्वराज्याची शपथ घेऊ शकला.

त्या काळी पुण्यात गाढवाचा नांगर फिरवल्यामुळे पुणे ओसाड झाले होते. शिवबाच्या हाताने जिजाऊंनी पुण्यात सोन्याचा नांगर फिरवून पुण्याचे सोने केले. त्याच मातीत त्यांनी शिवबाची जडणघडण केली. उत्तम प्रशासक, रयतेची काळजी, राज्याचा विकास, रणनीती, गनिमी कावा, समान न्याय, गद्दारी करणाऱ्यास कठोर शिक्षा, लेकीसुनांचा सन्मान, सामान्य व्यक्तीकडून असामान्य काम करून घेण्याची कुशलता, धर्म-संस्कृतीची जोपासना अशा अनेक पैलूंनी त्यांनी शिवबाला घडविले व अनेक आघाड्यांवर विजयश्री मिळून गनिमाला पळवून लावण्याचे धारिष्ट्य त्यामुळेच राजे करू शकले. जीवापाड प्रेम करणारी माणसं राज्यांना साथीला मिळाली. सुंदर, सुमंगल हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.

स्वराज्याच्या या यशस्वी वाटचालीत जिजाऊंनी स्वत:च्या ऐहिक सुखाचा त्याग केला होता. मुलासह स्वत:चे सर्वस्व अर्पण केले होते. मुघलशाही, निजामशाही व आदिलशाही यांच्याशी दोन हात करताना काय होईल सांगता येत नव्हते. तरीही त्या तपस्वी योगीनिसारख्या रयतेच्या पाठीशी प्रेमाची व शाबासकीची थाप देण्यासाठी खंबीर उभ्या होत्या. अनेक पुत्रांची स्वराज्याच्या यज्ञात आहुती पडली होती, पण आऊसाहेबांचा मायेचा हात फिरल्यावर क्षणात दु:ख नाहीसे होत. जिजाऊ एक तपस्वी योगिनी म्हणता येईल, कारण बिकट प्रसंगी, मग ती अफजलखानाची भेट असो किंवा शाहिस्तेखानाची स्वारी असो अथवा शिवबाची आग्र्यातील नजरकैद, जिजाऊंनी कधीधैर्य सोडले नाही व शिराज्याभिषेक सोहळ्यासारख्या आनंदाच्या क्षणी त्या कधी वाहून गेल्या नाही. त्यांचे अवघे जीवन एक महान स्थितप्रज्ञ योगिनीसारखेच होते. सर्वांना युगानुयुगे प्रेरणा देणारे...

**-प्रमिला माळी-मंडलिक**
**श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर, पनवेल**

---

# तू घे भरारी!

नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळावर अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू या प्रकल्पाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्या या भव्य दिव्य कार्यक्रमाला ग्रामीण महिलांची प्रचंड गर्दी होती. महिलांचा उत्साह दिसून येत होता. महिलांच्या आसन व्यवस्थेकडे आयोजकांनी विशेष लक्ष दिले होते.

उपस्थित महिला हौसेने एकाच रंगाच्या साड्या परिधान करून आल्या होत्या. त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती व आशावाद हे विकसित महाराष्ट्राचे प्रतिबिंब होते. शासनाच्या योजना या केवळ कागदावरच न राहता शेवटच्या घटकापर्यंत पोहचत आहेत याचे उत्तम उदाहरण या निमित्ताने दिसले. भडगाव (ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर) येथून आलेल्या वैशाली दीपक जगताप म्हणाल्या की, आम्ही जरी ग्रामीण भागात राहत असलो म्हणून काय झालं, आम्हालाबी आमच्या संसारात हातभार लावायचा हाय. ग्रामीण भागात महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणी ओळखून सरकार आमच्या पाठीशी खंबीर उभं हाय, म्हणूनच आम्हाला सरकारकडून आर्थिक मदत मिळाली. त्यातून आम्ही बचत गट स्थापन केलाय. या बचत गटाच्या माध्यमातून गावातच वॉटर फिल्टर, दूध संकलन केंद्र चालू केले आहे. त्याचबरोबर कॉमन सर्विस सेंटर चालू करून सगळ्या सुविधा या सेंटरमधून पुरवतो. त्यामुळे गावकऱ्यांना यांत्रिक साधने दुरूस्त करण्यासाठी बाहेर जावे लागत नाही. मायबाप सरकार खऱ्या अर्थाने आमचा आधार बनला आहे.





रायगड जिल्ह्यातील खालापूर येथून आलेल्या अर्चना चंद्रकांत वालम यांना दोन जुळ्या मुली असून शासनाच्या सुकन्या योजनेचा लाभ मिळाला असल्याचा त्यांनी या वेळी सांगितले, तर नागमठाण (ता. वैजापूर) येथील विजया चांगदेव घोडके यांना उमेद अभियानांतर्गत बँक कर्ज मिळाल्याचे सांगितले. स्टार्टअप योजनेंतर्गत खेळतं भांडवल मिळालं. त्यातून त्यांनी कापड व्यवसाय सुरू करून आपल्या कुटुंबाला हातभार लावत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी १५ गावं मिळून एक ग्रामसंघ स्थापन केला आहे. प्रभात संघ अंतर्गत शेतकरी कंपनी स्थापन केली आहे. विविध डाळी, धान्य, कडधान्य मशीनद्वारे स्वच्छ करून ग्राहकांना माफक दरात उपलब्ध करून देतात. स्वत:सोबत इतर महिलांना आर्थिक लाभ मिळवून देत आहेत.

गणेशकृपा या बचत गटाच्या माध्यमातून उरण येथून आलेल्या शोभा धनाजी म्हात्रे यांनी पापड लघुउद्योग सुरू करून २५ ते ३० महिलांना रोजगार उपलब्ध करून दिलाय. याकरिता त्यांच्या बचत गटाला १५ हजारांचे कर्ज शासनाकडून उपलब्ध झाल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. एक टक्का व्याजदराने एक लाखाचे कर्जदेखील उपलब्ध झाले आहे. यातून एक बचत गट स्थापन करून त्यांनी लोणचे, मसाला, चहा पावडर विविध प्रकारचे लाडू तयार करून त्या आत्मविश्वासाने स्वत:च्या पायावर उभ्या आहेत.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथून आलेल्या वर्षा केतकावळे आणि सायली अक्षर पांघारे यांनादेखील शासनाच्या माध्यमातून एचडीएफसी बँकेकडून कर्ज उपलब्ध होऊन कुकुटपालन व्यवसायात त्या आत्मविश्वासाने उतरल्या आहेत. मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण योजनाचा लाभ घेतल्याची प्रातिनिधीक उदाहरणे सांगता येतील.

**-विभागीय माहिती कार्यालय, नवी मुंबई**

# श्रीवर्धन तालुक्यातील उर्दू शाळांना शिक्षकांची प्रतीक्षा

**अलिबाग : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात उर्दू शिक्षकांची ५४ पदे मंजूर आहेत. ज्यापैकी ३६ पदे सध्या रिक्त आहेत. तालुक्यातील नऊ उर्दू शाळा अशा आहेत जिथे एकही उर्दू शिक्षक कार्यरत नाहीत. अनेक प्रयत्न करूनही उर्दू शिक्षक मिळत नसल्याने या शाळांमधील शिक्षण व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.


(प्रातिनिधीक छायाचित्र)

रायगड जिल्ह्यात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात असलेल्या तालुक्यात जिल्हा परिषदेकडून उर्दू प्राथमिक शाळा काढण्यात आल्या आहेत. यात प्रामुख्याने मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा, महाड तालुक्यांचा समावेश आहे. मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी हा या मागचा मूळ उद्देश होता.

आज उर्दू शाळा तर आहेत, पण शिकवायला शिक्षकच नाहीत अशी गत या शाळांची झाली आहे. श्रीवर्धन तालुक्यात ५४ उर्दू शिक्षकांची पदे मंजूर आहेत. यातील १८ पदे भरली असून ३६ पदे रिक्त आहेत. त्यामुळे तालुक्यातील नऊ उर्दू शाळांमध्ये सध्या एकही उर्दू शिक्षक कार्यरत नाहीत. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शिक्षकांवर या शाळांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष संपत आले तरी या शाळांना उर्दू शिक्षक मिळालेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

तालुक्यातील कोलमांडला, बागमांडला, सायगाव, गाळसुरे, रानवली, हरवीत, दिघी, सर्वे, कारला या उर्दू माध्यम शाळांमध्ये सध्या एकही उर्दू शिक्षक कार्यरत नाही. त्यामुळे या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पूरता शिक्षणाचा बोऱ्या वाजला आहे. शिक्षकांची रिक्त पदे लक्षात घेऊन जिल्हा परिषदेनी मध्यंतरीच्या काळात निवृत्त शिक्षकांना कंत्राटी पध्दतीने नेमणूक दिली, पण यात उर्दू शिक्षकांचे प्रमाण नगण्य असल्याने उर्दू शाळांतील रिक्त पदांचा प्रश्न अनुत्तरीत राहिला.

**“ या शाळांमध्ये तातडीने उर्दू शिक्षकांची नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे. तालुक्यातील ५० टक्क्यांहून अधिक उर्दू शिक्षकांची रिक्त आहेत ही वस्तूस्थिती आहे, पण रिक्त भरली जावी यासाठी पाठपुरावा सुरू आहे. भरती प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यामुळे ही प्रक्रीया पूर्ण झाल्यावर तालुक्याला उर्दू शिक्षक मिळतील, अशी अपेक्षा आहे.**

**–नवनाथ साबळे,**
**गट शिक्षण अधिकारी, श्रीवर्धन**

# जि.प.च्या १०० वर्षे जुन्या शाळेच्या नूतनीकरणाचे भूमिपूजन

## आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते शुभारंभ



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद हाळ येथील जुन्या १०० वर्षाच्या उर्दू शाळेचा भूमिपूजन सोहळा धार्मिक पठण प्रार्थना व आभार गीत सादर करीत आमदार महेंद्र थोरवे यांच्या करण्यात आला.

शाळेच्या नवीन बांधकामात सहा वर्ग खोल्या, संरक्षण भिंत व इतर बांधकाम जिल्हा परिषद सेस योजनेतून सुमारे एक कोटी पंधरा लाख मंजूर झाल्याने समस्त हाळ ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समिती, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत शाळेच्या भव्य पटांगणावर ठेवलेल्या भूमिपूजन सोहळ्यात ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्या वतीने आमदार महेंद्र थोरवे यांचे जोरदार स्वागत, सत्कार व आभार फुलांचा वर्षाव करीत करण्यात आला.

या वेळी सत्काराला उत्तर देताना आमदार महेंद्र थोरवे म्हणाले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी मी सदैव बांधील असल्याचे सांगत हाळ ग्रामपंचायत उपसरपंच अझीम मांडलेकर व त्यांच्या सर्व सहकारी यांनी केलेल्या पाठपुराव्याचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमास अल्पसंख्याक नेते नौफिल सय्यद, हुजेफा सय्यद, शिवसेना नेते विजय पाटील, शिवराम बदे, संजय देशमुख, संदेश पाटील, हमीद अन्सारी, रोहिदास पिंगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक एम.पी.खोपडे, सरपंच शबनम मुल्ला,उपसरपंच अजीम मांडलेकर, सदस्य कासिम बेडेकर, कमली वाघमारे, असिफ बेडेकर, प्रभास क्षीरसागर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष जाहिदा मुल्ला, ग्रामस्थ मंगेश क्षीरसागर, चंदर वाघमारे तसेच मुख्याध्यापक जलालुद्दीन सांगरे, शिक्षक कय्युम दाखवे, अहमद वाडेकर, शगुप्ता सय्यद, ग्रामसेवक स्वप्नाली बागल, अन्य मान्यवर, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोरघाटामध्ये रिक्षा अपघातात तिघे जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

जुन्या मुंबई पुणे महामार्गावरील बोरघाटात शिंग्रोबा मंदिराच्या विरुद्ध दिशेस असलेल्या खिंडीमध्ये एका रिक्षाचा अपघात झाला. यामध्ये चालकासह तीन प्रवासी जखमी झाले.

जखमींमध्ये १० वर्षांच्या मुलाचा सामावेश असून जखमींना खोपोली नगरपालीकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. किरकोळ जखमींना उपचार करून सोडून देण्यात आले तर रिक्षाचालक बळीराम लक्ष्मण राठोड (वय ३५) यांच्या पायाला गंभीर जखम असल्याने नवी मुंबई येथील एमजीएम या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर हर्ष रोहीदास चौधरी (वय १०, रा. कोपर खैरणे, नवी मुंबई) व दोन प्रवासींना घरी सोडण्यात आले आहे. ही घटना शनिवारी सकाळी ८ वा सुमारास घडली.






**माणगाव : भाजप युवा मोर्चा प्रदेश सचिव अशोक शेळके यांचे युवा मोर्चा दक्षिण रायगडतर्फे रायगड लोकसभा विस्तारक रमेश ढेबे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, उपाध्यक्ष परेश सांगळे, ग्रामपंचायत सदस्य सचिन सत्वे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य जगदीश शिंदे, भाजप तालुका क्रीडा आघाडी अध्यक्ष नारायण शिंदे, नमो चषक श्रीवर्धन विधानसभा संयोजक मंदार मढवी,भारत उंडरे, धीरज पाटील व कार्यकर्ते यांनी स्वागत केले.** (छाया : सलीम शेख)

# पेणमधून मायलेकीचे अपहरण; पतीची तक्रार

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील तरेआळी येथील सद्गुरु प्राईड सोसायटीमध्ये राहणारी महिला व तिच्या तीन वर्षांच्या मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली. फिर्यादी पती वैभव घोसाळकर यांनी पेण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार तीन वर्षांच्या मुलीसह पत्नीच्या अपहरणाची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आपली तपासाची चक्रे वेगाने फिरली असून अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास दरम्यान मुलगी व आई यांचा तपास अद्याप लागला नसल्याने लहान मुलगी व महिलेबाबत कोणाला माहिती मिळाल्यास पेण पोलिसांजवळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



पेण येथील महिला विधी वैभव घोसाळकर (वय ३६) यांचा रंग सावळा, चेहरा गोल, उंची सुमारे पाच फुट, केस तोकडे, राखाडी पंजाबी ड्रेस, पायात सॅन्डल, उजव्या हातावर इंग्रजीमध्ये साई नाव व मोराच्या पंखांचे चित्र नोंदविलेले, गळ्यात काळे मण्याचे एकसर असलेल्या वर्णनाची महिला व तिची मुलगी सिया वैभव घोसाळकर, चेहरा गोल, रंग गोरा, अंगाने मध्यम, उंची सुमारे २.५ फूट, गुलाबी हाफ टीशर्ट व पायात गुलाबी चप्पल, अशा वर्णनाच्या लहान मुलीचे त्यांचे राहात्या घरातून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने (२९ डिसेंबर रोजी) नेल्याने पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या वर्णनाची महिला व लहान मुलीची माहिती कोणाला मिळून आल्यास त्याची खबर पेण पोलीस ठाण्यात देण्याचे आवाहन करण्यात आले असून याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक मिनल शिंदे या करीत आहेत.

# ताकई तलावात मृतदेह आढळला

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील ताकई गावा जवळील पेशवेकालीन तलावात एका पुरुष जातीच्या अनोळखी व्यक्तीचे प्रेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

दुपारी एक वाजण्याच्या सुमारास खोपोली पोलिसांना तलावात पुरुष जातीचे प्रेत तरंगत असल्याचा फोन आल्यानंतर यंत्रणा सतर्क झाली, अपघातग्रस्त मदत टीमचे सर्व सदस्य घटनास्थळी हजर राहून दोरीच्या साह्याने या व्यक्तीचे प्रेत बाहेर काढून पुढील कार्यवाहीसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. तीन दिवसांपासून पाण्यात तरंगत असल्याने दुर्गंधी पसरली होती. हा व्यक्ती आदिवासी असल्याचाही अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

खोपोली पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# पोयनाड येथे प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड आदिवासीवाडी येथे प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय अभियानाचे शिबिराचे आयोजन मंडळ अधिकारी कार्यालय पोयनाड यांच्या तर्फे करण्यात आले होते.




देशातील आदिम जमातीच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रधानमंत्री जनमन या योजनेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी रायगड भा.प्र.से योगेश म्हसे, उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण व तहसीलदार अलिबाग विक्रम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. ११) पोयनाड आदिवासीवाडी येथे मंडळ अधिकारी महेश निकम तसेच तलाठी आर. एन पाटील प्रकल्प कार्यालय पेण प्रतिनिधी आश्रम शाळा, प्रणित पाटील सेतु व्यवस्थापक पेझारी व इथर मंडळातील तलाठी व कर्मचारी यांनी मेळावा आयोजित करून शासकीय दाखले वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात ४० आदिवासी बांधवांना लाभ देण्यात आला असून पुढील काही दिवसात मंडळ कार्यालय पोयनाड व चरी येथील विविध आदिवासी वाड्यांवर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरामार्फत आदिवासी समाजास जास्तीत जास्त लाभ देण्याचा संकल्प आहे.

# प्रेमसंबंधातून तरुणाची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील काकरतळे परिसरात राहणाऱ्या एका तरुणाने प्रेम संबंधातून आत्महत्या केल्याचे शुक्रवारी (दि. १२) रात्री उघड झाले. ज्या तरुणीशी त्याचे प्रेम संबंध होते तिचे लग्न ठरल्याच्या कारणातून त्याने आत्महत्या केली असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

महाड शहरातील काकर तळे परिसरात असलेल्या प्रसिद्ध व्हाईट हाऊस या इमारतीमध्ये विनायक बद्रीनाथ फुके (वय २५, मूळ राहणार अंजनी बुद्रुक, मेहकर बुलढाणा) याने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली आहे. गावात राहणाऱ्या एका मुलीबरोबर त्याचे गेली पाच वर्षांपासून प्रेम संबंध होते, मात्र या मुलीचे लग्न ठरल्यामुळे विनायक हा अस्वस्थ होता यातूनच त्याने आत्महत्या केली असल्याचे महाड शहर पोलीस सूत्रांनी सांगितले.

याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात देवेश विजय शहा यांनी खबर दिली असून याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू झाल्याची रजिस्टर वर नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास महाड शहर पोलीस करीत आहेत.

# सिद्धेश्वर ग्रामपंचायतीतर्फे विकसित भारत संकल्प यात्रा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सिद्धेश्वर यांनी विकसित भारत संकल्प यात्रा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. केंद्र सरकारच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचविणे या उद्देशाने देशव्यापी मोहीम सुरू आहे.



(छाया : धम्मशील सावंत)

कार्यक्रमास उपस्थित कृषी अधिकारी अशोक महामुनी व सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर विशेष उल्लेखनिय सत्कार अंतर्गत सकपाळमॅडम, जनार्दन भिलारे, वेदा यादव, उमेश जाधव यांना शाल, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत प्रमुख वक्ते कृषी अधिकारी अशोक महामुनी, आरोग्य वि. अधिकारी धनंजय पाटील, कृषी सहायक क्षीरसागर, तलाठी मळेकर ,भारत गॅस प्रतिनिधी शिंदे, प्रहार संघटना प्रतिनिधी चंद्रकांत चव्हाण यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. यानंतर शाळा सिद्धेश्वर विद्यार्थिनी, मुंढे आळी महिला मंडळ यांनी बहारदार नृत्य सादर केले. त्यांना सन्मानित करण्यात आले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते आयुष्यमान भारत कार्ड, जॉब कार्ड यांचे लाभार्थ्यांना वाटप केले.

बेबी केअर किट वाटप केले. यानंतर ड्रोन प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यानंतर सरपंच आशिका पवार, उपसरपंच शरद किंजावडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी मंडळ अधिकारी साळुंखे, तलाठी बोरसे, आशा कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी, डॉक्टर तांबडे, प्राथमिक शाळा मुख्याध्यापक व शिक्षक, थोरात, ग्रामसंघ अध्यक्ष प्राची यादव, सि.आर.पी.सुरेखा यादव, पो.पाटील सुनील पोंगडे, माजी सरपंच कृष्णा वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते संतोष यादव, निलेश शिर्के, आजी माजी सरपंच, उपसरपंच वसर्व सदस्य अंगणवाडी मदतनीस, गुंजाळ सर यांनी उपस्थिती दाखवून भारत संकल्प यात्रेला मोलाचे सहकार्य, योगदान दिले.

कार्यक्रमासाठी सरपंच पवार, उपसरपंच किंजावडे व सर्व सदस्य, सर्व कर्मचारी वृंद, ग्रामसेवक खेडकर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनार्दन भिलारे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शरद किंजावडे यांनी मानले.

## पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | Harjeet Singh, Plot No.E/१६ Near Prime Mall, Sec-१२, Kharghar. | ०१ जंगली झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Plot No.E/१६ Near Prime Mall, Sec–१२, Kharghar या भूखंडाच्या बाजुला ०१ झाड असुन, ते झाड धोकादायक व पडण्याच्या स्थीतीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**जा.क्र. पमपा/उद्यान/२४/प्र.क्र. २०२४**
**दिनांक :– १४/०१/२०२४**

**सही/–**
**वैभव विधाते**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## निवडक



### दिघा गाव रेल्वेस्थानकाचे उद्घाटन

**नवी मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी अनेक प्रकल्पांचे उद्घाटन केले. या वेळी दिघा गाव रेल्वे स्थानकाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे व माजी खासदार संजीव नाईक यांनी उपस्थिती लावली. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी प्रत्यक्ष या स्थानकात जाऊन पहिले प्रवासी तिकीट काढले. या वेळी माजी नगरसेवक नवीन गवते, दीपा गवते, अपर्णा गवते, उज्वला झंजाड, विकास झंजाड तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

### कारच्या धडकेने डिलेव्हरी बॉय जखमी

**पनवेल :** मद्याच्या नशेत धोकादायकपणे वाहन चालवून कारचालकाने सायकलला धडक दिल्याने २४ वर्षीय डिलिव्हरी बॉय जखमी झाला आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात कार चालक राहुल खेडेकर यांच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंजन तपन धारा हा सेक्टर २०, खारघर येथे राहत असून तो चिकन व मच्छीच्या दुकानावर डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. मच्छीचे ऑर्डरचे पार्सल घेऊन जाताना एका कारचालकाने पाठीमागून धडक दिली. यात तो जखमी अवस्थेत रस्त्यावर पडला. या वेळी कारचालक मदतीला न थांबता तसाच सुसाट वेगाने पळून गेला. नागरिकांनी त्याला मेडिसिटी हॉस्पिटल सेक्टर सात, खारघर येथे दाखल केले. त्याच्यावर दवाखान्यात उपचार सुरू आहेत.

### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे स्नेहसंमेलन



**नवी मुंबई :** आरसीएफ एक्स एम्प्लॉईज सोशल फोरमच्या विद्यमाने दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेले निवृत्त कर्मचाऱ्यांसाठीचे १९वे वार्षिक स्नेहसंमेलन यूथ कौन्सिल, नेरूळ, नवी मुंबई संस्थेचे अध्यक्ष सुभाष हांडे देशमुख यांच्या पुढाकाराने झाले. आरसीएफ कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकएस. सी. मुडगेरीकर, डॉ. स्मिता मुडगेरीकर, वित्त संचालिका नजहत शेख, भूतपूर्व अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उदय शंकर झा, डी. के. वर्मा, संचालक एच. एस. करंगळे, भूतपूर्व कार्यपालक संचालक रा. ह. पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सर्वश्री प्रभाकरराव साळुंखे, डी. टी. बारकुंड, सुबोध मोरजकर, विलास मेहता, श्री. चंद्रगिरी, दीपक सालवणकर, आर. एस. नाईक, सी. एल. शर्मा यांचे मोलाचे योगदान लाभले.

### नवीन पाईपलाईनची मागणी



**नवी मुंबई :** भिमाशंकर को ऑप हौ. सोसायटीमध्ये मागील काही दिवसांपासून कमी दाबाने होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यासंदर्भात माजी नगरसेवक तथा सभागृह नेता रवींद्र इथापे यांनी सोसायटीतील कनेक्शनची पाहणी केली. या वेळी नवीन पाईपलाईनच्या मागणीचे पत्रक पाणीपुरवठा विभागाचे नवी मुंबईचे प्रमुख कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे, कनिष्ठ अभियंता भानुशाली यांच्याकडे सुपूर्द केले व मंजुरीसाठी पाठविले. या वेळी भिमाशंकरचे सचिव संजय चव्हाण, संचालक रंगराव पाटील, संचालक भिमराव सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# एनएमएमटीची पनवेल-कल्याण व्होल्वो वातानुकूलित बससेवा सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई एनएमएमटी परिवहन सेवेने पनवेल रेल्वे स्थानक ते कल्याण रेल्वे स्थानक व्हाया तळोजा एमआयडीसी अशा सेवा दर अर्ध्या तासाच्या अंतराने दोन्ही बाजूने सुरू केल्या आहेत, या बसेस वातानुकुलीत आहेत.



या बसचे एकेरी भाडे ६० रुपये आहे. पनवेल ते कल्याण साध्या बसचे भाडे ४५ रुपये आहे. साध्या बसेस पण चालू ठेवल्या आहेत. ह्या सेवेची पहिली बस फेरी पनवेल रेल्वे स्थानकावरून सकाळी (पहाटे) ५.३० वाजता सुटेल व शेवटची बस कल्याण येथे जाण्यासाठी रात्री ९.१० सुटेल. कल्याण रेल्वे स्थानकावरुन पनवेल रेल्वे स्थानकावर येण्यासाठी सकाळी ७ पहिली बस सुटेल व शेवटची बस रात्री १०.५५ला सुटेल.

या बस (व्होल्वो) चे भाडे किफायतशीर असल्याने प्रवासी या सेवेचा लाभ घेतील, असा आशावाद प्रवासी संघाच्या कार्यकारिणीने व्यक्त केला आहे. दरम्यान, पनवेल प्रवासी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी एनएमएमटीचे व्यवस्थापक श्री. जंगले यांची भेट घेऊन करंजाडे – बेलापूर (व्हाया नवी मुंबई विमानतळ मार्गे) बस सेवा सुरू करण्याबाबतचे निवेदन दिले असून या मार्गाचे सर्वेक्षण करून फिजिबिलीटी अहवाल तयार करण्याची विनंती केली आहे. ही सेवादेखील लवकरच सुरू होण्याची शक्यता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

या दोन्ही परिवहन बस सेवांची नवी मुंबई परिवहन बस सेवांची पनवेलकर प्रवासी बांधवांना नववर्षात भेट मिळाल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानून पुढील कार्याला शुभेच्छा व शुभाशीर्वाद देण्यात आले.

## एसबीसीटी विद्यालयात गुरुवारी स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर (एसबीसीटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक आणि माध्यमिक विभागाचे १२वे वार्षिक स्नेहसंमेलन आणि बक्षीस वितरण २०२३-२४ समारंभ गुरुवारी (दि. १८) सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

उमंग या शीर्षकाखाली व संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या समारंभाचे प्रमुख पाहुणे आमदार महेश बालदी आहेत.

विशेष अतिथी म्हणून उरण डेप्युटी कलेक्टर जनार्दन कासर, उरणचे एसीपी धनाजी क्षीरसागर, उरण तहसीलदार उद्धव कदम, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश कदम यांची उपस्थिती असेल. यासह मान्यवर संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, संचालक अमोघ ठाकूर तसेच कमिटी मेंबर शेखर तांडेल, सुरेश पाटील, सुनील पाटील यांची उपस्थिती लाभेल. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मुख्याध्यापिका अनुराधा काठे, विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मेहनत घेत आहेत.

## आज नवी मुंबईत विशाल नगर कीर्तन

**नवी मुंबई : बातमीदार**

गुरुद्वारा श्री गुरु सिंह सभा वाशी आणि गुरुद्वारा श्री दशमेश दरबार कोपरखैरणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १४) रविवारी गुरुद्वारा कोपरखैरणे ते वाशी गुरुद्वारापर्यंत विशाल नगर कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

दहावे गुरू श्री गुरू गोविंद सिंह जी हे नगर कीर्तन दरवर्षी नवी मुंबईतील सर्व गुरुद्वारांच्या व्यवस्थापकीय समित्यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित केले जाते. साहिब श्री गुरु ग्रंथ साहिब जी च्या आश्रयाने पारंपारिक पोशाख परिधान करून पंज प्यारा यांच्या नेतृत्वाखाली निघणाऱ्या शोभायात्रेत नवी मुंबईतील सर्व मंडळी सहभागी होणार आहेत. मिरवणुकीच्या संपूर्ण मार्गात संगत गुरबानी शब्द कीर्तन करण्यात येणार आहे. शीख तरुणांकडून पारंपरिक मार्शल आर्ट गतकाचे प्रदर्शन होणार आहे. गुरू ग्रंथ साहिब जी एका सुशोभित मोठ्या वाहनावर स्थापित केली जाईल. गाड्यावर सर्व रागी गुरबानी कीर्तन करतील.

या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्वांसाठी विशिष्ट ड्रेस कोड आहे. नवी मुंबईच्या गल्लीबोळात क्वचितच पाहिला जाणारा किंवा दुर्मीळ दैवी देखावा यात सादर केला जाणार आहे. कोपरखैरणे येथून दुपारी अडीच वाजता नगर कीर्तन निघेल आणि सायंकाळी साडेसहा वाजता वाशी गुरुद्वारा येथे सांगता होईल. नगर कीर्तना नंतर वाशी गुरुद्वारा येथे गुरू का लंगर देण्यात येईल.

## कला-क्रीडा स्पर्धांमध्ये ६० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'नमो चषक २०२४'चा शुभारंभ १५०, ऐरोली विधानसभा मतदारसंघामध्ये शुक्रवारी (दि. १२) आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते जल्लोषात झाला. विविध कला आणि क्रीडा प्रकारातील स्पर्धांमध्ये ६० हजार विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला आहे.

कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक विद्यालयाच्या प्रशस्त पटांगणावर चित्रकला स्पर्धेने नमो चषकाची सुरुवात झाली. या चित्रकला स्पर्धेमध्ये तब्बल पाच हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला. याशिवाय नमो चषक स्पर्धेमध्ये खो-खो, कबड्डी, कुस्ती, क्रिकेट, मॅरेथॉन, सायकलिंग, नृत्य, वक्तृत्व, बुद्धिबळ, निबंध अशा विविध प्रकारातील १० क्रीडा आणि सात प्रकारच्या सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.



**नमो चषकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे क्रीडा आणि कलागुण प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.**
**-आमदार गणेश नाईक**

**नमो चषकाच्या माध्यमातून स्थानिक खेळाडूंना आणि कलाकारांना संधी मिळणार आहे. गुणवंतांना राज्य आणि देश स्तरावरदेखील कामगिरी करण्याची संधी प्राप्त होवो. नमो चषक हा समाजाला सदृढ आणि तंदुरुस्त ठेवणारा महोत्सव आहे.**
**-संदीप नाईक, जिल्हाध्यक्ष, भाजप**

**नवी मुंबई भाजप जिल्हा आणि नवी मुंबई भाजपा युवा मोर्चा यांच्यावतीने नमो चषकाचे आयोजन केले असून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी सहभागी व्हावे.**
**-अमित मेढकर, युवा मोर्चा अध्यक्ष, भाजप**

## राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात शुक्रवारी (दि. १२) अभिवादन करण्यात आले.

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर यांनी पुष्पहार अर्पण केला. इ. नववीच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वर्गशिक्षिका चारुशीला ठाकूर व संगीत विशारद साईनाथ मोकल यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करण्यात आले. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, विद्यालयाचे लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्यासह जुनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, उमेश पाटील, क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, अपर्णा देवकुळे, सुजाता शेलार-चौधरी, सोनाली घरत, ज्योत्स्ना कोळी व विद्यार्थी उपस्थित होते.

## वाशीत जिजाऊ जयंती सोहळा

**नवी मुंबई :** छत्रपती संभाजी महाराज सेवा समिती व जिजाऊच्या लेकी आयोजित राजमाता जिजाऊ जयंती उत्सव सोहळा २०२४, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, वाशी यांच्या सहयोगातून नवी मुंबई येथे मोठ्या दिमाखदारपणे झाला.

राष्ट्रप्रेरिका माँसाहेब जिजाऊ कश्या असाव्या हे व्याखाती कु. देवयानीजी घरत या जिजाऊच्या लेकीने व्याख्यानातून समजाऊन सांगितल. यात कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा सोहळा पार पाडण्या करता अर्चना झेंडे, मनिषा देसाई, केशर घाडगे, रश्मी महाडिक व वैशाली वाळुंज यांनी विशेष मेहनत घेतली. हे प्रथम वर्ष जरी असले तरी येणाऱ्या काळात जिजाऊसोबत त्यांचे विचार घरा-घरात पोहचतील व मना मनात जिजाऊ जयंती साजरी होणार यात तीळमात्र शंका नाही असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या करता आपण हे संस्कारबीज जिजाऊ जयंतीच्या माध्यमातून रोवल्याचा आनंद व्यक्त केला.

या दरम्यान उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमंगिनी पाटील यांनी जिजाऊ जयंतीच्या निमित्ताने परिवहन नियमांचे महत्त्व व आई वडिलांचे कष्ट या भावनिक विषयाला हात घालून कॉलेज मुलींना त्या बद्दल जागरूक केले.

या वेळी क्षमा वाखारकर (साहित्यिक, कवयत्री), डॉ. वंदना कुचिक (जनरल फिजिशियन), सलूजा सुतार, वैशाली शिंत्रे, कविता पाटील, डॉ. राजेश्री पाटील, मानसी रसाळ, संगीता नाईक, स्वप्निल घोलप, अभिजित भोसले महेश लावड आदी, विद्यार्थी उपस्थित होते.

## मकरसंक्रांतीची सर्वत्र लगबग

### तिळगुळ, पतंगांची खरेदी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मकर संक्रांतीच्या तयारीला आता वेग आला आहे. आठवड्यावर आलेल्या सणासाठी बाजारात लगबग सुरू असून ग्राहकांसाठी विविध प्रकारचे तिळगुळ, गजक, रेवड्या, साखरेचा हलवाबरोबर रंगीबिरंगी पतंग लहानांपासून मोठ्यांचे लक्ष वेधत आहे.



लहान मुलांना आकर्षित करण्यासाठी स्पायडरमॅन, डॉरीमॉन ट्विटी यांसारख्या कार्टून असलेल्या पतंगांना विशेष मागणी दिसून येत आहे. आकारानुसारच्या पतंगांसाठी १०० ते ४०० रुपये इतका दर आहे. त्याच्या सोबतीला सुरत वरून खास तयार केलेला मांजा सुद्धा बाजारात उपलब्ध झालेला आहे. यंदा दुकानदारांनी नायलॉनचा मांजा विकणार नसल्याचा संकल्प केला आहे. तसेच अनेकदा बोट कापण्याचा किंवा पक्ष्यांना इजा होण्याचा धोका असतो. शिवाय दुचाकीस्वारांनादेखील जीव गमवावा लागल्याने प्रशासनाने बंदी घातली आहे.

थंडी सुरू होता बाजारात तिळाला महत्त्व येते. शरीराला आवश्यक ऊर्जा देण्याचे काम तीळ करते. त्यामुळे मागणी वाढत असल्याने तिळाचे दर २०० रुपये प्रतिकिलोवर गेले आहेत. याचा परिणाम बाजारात तिळाचे लाडू, गजक, रेवड्या, चिक्कीसारख्या पदार्थांवर झाला आहे.

तिळाचे लाडू ७० ते १७० रुपये अर्धा किलोला विकले जात आहेत. तर भोपळ्याच्या बिया, शेंगदाणे, तीळ, गूळ, सूर्यफुलाच्या बिया यांपासून घरगुती पद्धतीने बनवले जाणारे गजक ३०० ते ५०० रुपये २५० ग्राम इतक्या किमतीला विकले जात आहे. त्याचसोबत साखरेचा हलवा, रेवड्या असे पदार्थही बाजारात उपलब्ध आहेत.

**नायलॉन धाग्यामुळे बोट कापण्याचा किंवा पक्ष्यांना इजा होण्याचा धोका असतो. त्यामुळे नायलॉनऐवजी अन्य माज्यांचा वापर करावा.**
**-नारायण गांधी, पतंग व्यापारी**

## नवी मुंबई महापालिका रुग्णालयात फळवाटप



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

जनकल्याण सामाजिक संस्थेने आपला दहावा वर्धापन दिन मोठ्या थाटामाटात साजरा केला. सर्वप्रथम, संस्थेच्या वतीने वाशी सेक्टर १० येथील महापालिका रुग्णालयात दाखल असलेल्या २५० रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

या वेळी महापालिका रुग्णालयाचे वैधानिक अधीक्षक डॉ. राजेश महात्रे, डॉ. प्रकाश राठोड, सरदार वल्लभभाई पटेल संस्थानचे संस्थापक अध्यक्ष व अपना दलाचे महाराष्ट्र प्रभारी महेंद्र वर्मा, नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृती संस्थानचे अध्यक्ष विनोद प्रधान, सर्वधर्मीय विकास मंचचे अध्यक्ष मेघनाथ भगत, अपना दल, नवी मुंबई अध्यक्ष आशिष गोस्वामी, दीक्षा बुक सेंटरचे संचालक दिनेश चव्हाण, जनकल्याण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष राजेश शर्मा, उमेश शर्मा, लालजी शर्मा, रमेश शर्मा, रमेश तिवारी, सरचिटणीस सुरेंद्र सरोज, मफतलाल चव्हाण, संतोष बाबर, सचिव विनोद बाबर आदी उपस्थित होते. या वेळी आभार सरचिटणीस सुरेंद्र सरोज यांनी केले.

## वारसा स्त्रीशक्तीचा अभियानांतर्गत व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बेलापूर शाखेतर्फे वारसा स्त्रीशक्तीचा अभियानांतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यान, 'वसा साऊ जिजाऊचा, ध्यास समता सन्मानाचा' या विषयावर शुक्रवारी (दि. १२) बेलापूर सेक्टर १९/२० मधील विद्या उत्कर्ष मंडळाचे, सिनीअर कॉलेज येथे आयोजित करण्यात आले होते.



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी अशिक्षीत जीवन जगण्याची परंपरा मोडून शिक्षीत जीवन जगण्याची परंपरा सुरू केली. हा वारसा पुढे चालत जाऊन समतेकडे गेला. गोदावरी परूळेकर, उल्का महाजन, वृषाली मगदूम अशा सामाजिक कार्य करणाऱ्या स्त्रियांनी हा सकारात्मक परिवर्तनाचा वारसा पुढे चालवला आहे. आपण कालबाह्य परंपरांना बाजूला करून शिक्षणाच्या माध्यमातून विज्ञानाच्या मार्गाने वाटचाल करूया. समाजाच्या विचारात व कृतीतून कालसुसंगत वर्तन अपेक्षित आहे. कालसुसंगत वर्तनाचा पाया वैज्ञानिक दृष्टिकोन आहे.

राजमाता जिजाऊ साहेबांनी स्वातंत्र्य हे मूल्य जनमानसात रूजवले. स्वातंत्र्य हा आपला अधिकार आहे, त्या बरोबर सामाजिक भान हे आपले कर्तव्य ठरते. स्वातंत्र्याचा योग्य विधायक कामांसाठी वापर करून उत्तम नागरिक बनूया.

स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रिसुत्रीचा महामार्ग आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाकडे नेतो, असा संदेश देण्यात आला.

व्याख्यानात अशोक निकम यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय मराठे, उप प्राचार्य डॉ. संजय गायकवाड व प्राध्यापक वैशाली ढमाळ उपस्थित होते. अंनिस कार्यकर्ते ज्योती क्षीरसागर व अरुण जाधव कार्यक्रमाला उपस्थित होते.

# अवकाळीने आंबा, काजू पीक धोक्यात

## किडींच्या प्रादुर्भावाची शक्यता; उपाययोजना करण्याच्या कृषी विभागाचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

सद्यस्थितीमध्ये अनेक भागांत बहुतांश ठिकाणी अवकाळी पाऊस सुरू आहे. तसेच अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरण दिसून येत आहे. ढगाळ वातावरण व पावसानंतर वातावरणामध्ये होणारा बदल किडींच्या वाढीसाठी अनुकूल आहे. अशा परिस्थितीमध्ये आंबा पिकावर तुडतुडे व फुलकिडी तसेच काजू पिकावर काजूवरील ढेकण्या आणि फुलकिडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. ते लक्षात घेता आंबा व काजू बागायतदारांनी आपल्या बागेची नियमितपणे पाहणी करून निगराणी करावी, असे आवाहन माणगाव तालुका कृषी अधिकारी अजय वगरे यांनी केले आहे.



तुडतुड्यांनी आर्थिक नुकसानीची पातळी (१० तुडतुडे प्रति पालवी/ मोहोर) ओलांडली असल्यास व ज्या ठिकाणी पीक पालवी अवस्थेत असेल अशा ठिकाणी डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही नऊ मि.ली. प्रती १० लिटर पाणी, पीक बोंगे फुटण्याच्या अवस्थेत असल्यास लॅम्बडा सायहॅलोथ्रीन पाच टक्के प्रवाही सहा मि.ली. प्रती १० लिटर पाणी व पीक मोहोर अवस्थेत असल्यास इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही तीन मि.ली. किंवा ब्युप्रोफेझिन २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाणी तसेच जर फळे वाटाण्याच्या आकाराची अथवा त्याहून मोठी असल्यास थायोमेथॉक्झाम २५ टक्के एक ग्रॅम प्रति १० लीटर पाणी या प्रमाणात वापरावे.

फुलकिडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास या किडींच्या व्यवस्थापनाकरिता स्पिनोसॅड ४५ टक्के प्रवाही २.५ मिली किंवा थायोमेथॉक्झाम २५ टक्के दोन ग्रॅम प्रति १० लीटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. (ही कीटकनाशके लेबल क्लेम नाहीत) तसेच काजूमध्ये ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने पालवी, मोहोर व फळधारणा झाली असल्यास त्याची पाहणी करावी.

या किडींचा प्रादुर्भाव आढून आल्यास दोन्ही किडींच्या व्यवस्थापनासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन पाच टक्के प्रवाही सहा मि.ली. किंवा प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. यापैकी एका किटकनाशकाची प्रति १० लि. पाण्यातून फवारणी करावी. (ही कीटकनाशके लेबल क्लेम नाहीत), असे कृषी अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

# खोपोलीतील बसस्टँडवर खासगी वाहनांची पार्किंग

## पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली गावातील पोलीस ठाण्यासमोरील एसटी बस स्टँडवर खासगी गाड्या पार्किंग केल्या जात असल्याने प्रवाशांना तसेच बसचालकांना या पार्किंगच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याबाबत प्रवाशांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करीत पोलिसांनी अशा वाहनांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.



या बसस्टँडवरून रायगड जिल्हा तसेच पनवेल, पेण, लोणावळा, बेलापूर सीबीडी, खालापूर तालुक्यातील आडोशी, देवन्हावे आदी भागात एसटी बस त्याप्रमाणे नगर परिषदेच्या शहर परिवहन सेवेच्या बसेस सुटतात. विशेषतः सकाळी व शाळा सुटल्यावर विद्यार्थी या स्टँडवरून प्रवास करीत असतात. बस उभी करण्याच्या जागीच खासगी वाहने पार्किंग केल्याने महामार्गावरच बसेस थांबवाव्या लागत आहेत. परिणामी वाहतूक कोंडी व अपघात होण्याची शक्यता आहे. अनेक वेळा बसचालक व खासगी वाहनचालकांमध्ये शाब्दिक वाद झाल्याचे प्रकारही घडले आहे.

यामुळे अशा खासगी वाहनांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थी व प्रवाशांनी केली आहे.

# मोग्रज ग्रामपंचायतीचे सदस्य शिवसेनेत दाखल



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायतीचे सदस्य आणि तेथील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते छगन कोकणे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

राष्ट्रवादीचे कार्यकर्ते छगन कोकणे, ग्रामपंचायत सदस्य विश्वास पारधी यांनी शिवसेनेत प्रवेश केला. आमदार महेंद्र थोरवे यांनी या दोघांचे पक्षात स्वागत केले. या वेळी युवा सेनेचे जिल्हा युवा अधिकारी जयेंद्र देशमुख, शिवसेना उपतालुका प्रमुख अंकुश शेळके तसेच संदेश सावंत आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# बैलगाडी स्पर्धेसाठी आता प्रांताधिकारी देणार परवानगी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात बैलगाडी स्पर्धेसाठी परवानगी मिळवण्यासाठी आता जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागणार नाही. प्रांताधिकारी कार्यालयात जाऊन स्पर्धा आयोजनाची परवानगी आता घेता येणार आहे. जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने बैलगाडी स्पर्धेच्या आयोजनाला अटी आणि शर्तींवर परवानगी दिली आहे. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाने बैलगाडी स्पर्धेच्या आयोजनासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या मार्गदर्शन सूचनांचे काटेकोर पालन करणे अभिप्रेत आहे. स्पर्धा आयोजनासाठी आतापर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज करावा लागत होता. यामुळे आयोजकांना अलिबाग येथे येऊन कागदपत्र आणि अर्जांची पूर्तता करावी लागत होती. त्यामुळे आयोजकांची मोठी गैरसोय होत होती. जाचक नियम अटींमधून सुटका करून घेण्यासाठी बेकायदेशीरपणे स्पर्धा आयोजित करण्याचे प्रमाणही वाढत होते.



ही बाब लक्षात जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांनी बैलगाडी स्पर्धेच्या आयोजनाचे अधिकार स्थानिक प्रांताधिकारी यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक प्रांताधिकारी कार्यालयात आता बैलगाडी स्पर्धा आयोजनाची परवानगी मिळू शकणार आहे. आयोजकांना त्यासाठी अलिबाग येथे यावे लागणार नाही. बैलगाडी स्पर्धेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होणाऱ्या अर्जांवर सात दिवसात परवानगी दिली जात होती, पण अर्जदारास विहीत नमुन्यात अर्ज दाखल करणे, कागदपत्रांची पर्तता करणे, परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे, संबधित विभागांचे अहवाल प्राप्त करून घेणे यास बराच वेळ लागत होता. त्यामुळे उपविभागीय अधिकारी कार्यालयांकडे यासंदर्भातील अधिकार देण्याचे निश्चित करण्यात आले.

**स्पर्धेचे स्वरूप बदलले**

*रायगड जिल्ह्यात बैलगाडी स्पर्धांचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले जाते. जत्रा, उत्सव, सणांच्या निमित्याने बैलगाडी स्पर्धा भरविल्या जातात. अलिकडे या स्पर्धांना राजकीय अधिष्ठानही प्राप्त झाले आहे. स्पर्धांना मिळणारा व्यापक प्रतिसाद बघून मोठ्या प्रमाणात स्पर्धा आयोजित केल्या जाऊ लागल्या आहेत. सुरुवातीला भांडी, रोख रक्कम यासारखी बक्षिसे स्पर्धा जिंकणाऱ्यांना दिली जात होती. आता मात्र लाखो रुपयांची बक्षिसे दिली जाऊ लागली आहेत. त्यामुळे स्पर्धांचे स्वरूप दिवसागणिक बदलत चालले आहे. भपकेबाज आयोजनावर भर दिला जाऊ लागला आहे.*

# शिष्यवृत्ती परीक्षेचा मुरूड पॅटर्न नक्कीच यशस्वी होईल

## शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांचा विश्वास



**मुरूड : प्रतिनिधी**

येथील माउंट कार्मेल हायस्कूलच्या भव्य पटांगणावर शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिर नुकतेच झाले. दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणवर्गाच्या उद्घाटन समारंभात रायगड जिल्हा परिषद प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी मार्गदर्शनपर भाषणात मुरूड हा डोंगरी तालुका असल्याचे सांगतानाच नियमित घेण्यात येणारे मार्गदर्शन वर्ग आणि अशा प्रकारे सराव केल्यास विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशाचे शिखर निश्चित गाठू शकतात, असे म्हटले. या वेळी मुरूडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी राबवत असलेल्या मुरूड पॅटर्नबद्दल प्रशंसोद्गार काढतानाच विद्यार्थीहिताचा हा पॅटर्न नक्कीच यशस्वी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

माउंट कार्मेल, कोर्लई हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी गायलेल्या स्वागतगीतानंतर गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी प्रास्ताविकातून मुरूड तालुक्याच्या शैक्षणिक बाबींचा लेखाजोखा मांडला. शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक राजेंद्र नाईक, संगीता खानावकर यांनी थोडक्यात मनोगत व्यक्त केले.

या वेळी प्रमुख उपस्थितांमध्ये केंद्रप्रमुख मोहिनी पाटील, माउंट कार्मेल संस्थेचे फादर ज्युलियस, मुख्याध्यापिका ज्युली, शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक मीना मोरे, मनिषा नाईक, शुभांगी राणे, हेमंत म्हात्रे, साधनव्यक्ती महेश भगत, विश्वनाथ म्हात्रे, दत्ता सातामकर, संतोष पुकळे, चेतन पाटील, सुनील काळे, अंजली पुकळे, उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसलेले तालुक्यातील चारशेहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. समारंभाचे सूत्रसंचालन महेश कवळे यांनी केले, तर आभार सुरेश मोरे यांनी मानले.

# सव्वादोन लाखांची चोरी करणारा १२ तासांमध्ये ताब्यात

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील खांडा परिसरात असलेले बंद घराचा फायदा घेत चोरट्याने गुरुवारी (दि. ११)रात्री डल्ला मारला. साधारण सव्वादोन लाखांचे दागिने आणि रोकड चोरट्याने लंपास केली होती. या चोरी प्रकरणाचा छडा नेरळ पोलिसांनी लावत अवघ्या १२ तासांत चोराला ताब्यात घेतले आहे. चोरट्याला कर्जत येथे दिवाणी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

नेरळ गावातील खांडा येथील रहिवासी महेंद्र हरीशंकर दुबे कुटुंबासह बाहेर गेले होते. याचा फायदा घेत चोरट्याने लॉकरमधील सोने, चांदीच्या वस्तू आणि काही रोकड असा साधारण सव्वादोन लाखांचा माल लंपास केला. याबाबत महेंद्र दुबे यांनी तातडीने नेरळ पोलीस ठाणे येथे शुक्रवारी पहाटे तक्रार दाखल केली. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी तत्काळ पाऊले उचलून कल्याण येथून आरोपी अविनाश राठोड याला पकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे. उपनिरीक्षक सरगर यांच्यासोबत गुन्हे प्रकटीकरण पथकाने ही कामगिरी केली. चोरट्याला कर्जत येथे दिवाणी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# मुले घडविताना जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा -रंजना धुळे

**कर्जत : प्रतिनिधी**

माँसाहेब जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर केलेले संस्कार, त्यांचे संगोपन, त्यांना दिलेली शिकवणूक यामुळेच त्यांना भारतभूमीवर जाणता राजा म्हणून संबोधले जाते. मुले घडविताना जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा, असे आवाहन महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष ॲड. रंजना धुळे यांनी केले.

महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जनसंपर्क कार्यालयाच्या सभागृहात जिजामाता जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सुमन देशमुख यांच्या हस्ते जिजामातांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. कांता सांगळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून जिजाऊंना अभिवादन करण्यात आले. त्या वेळी ॲड. धुळे बोलत होत्या.

कार्यक्रमास उपाध्यक्ष मनीषा पाटील, सरचिटणीस विमल देशमुख, राणी सावंत, अंकिता मोरे, सरपंच दीपाली पिंगळे, सरपंच जयवंती कोळंबे, सरपंच प्रभावती लोभी, माजी सरपंच प्रतिभा लोहकरे, माजी सरपंच निराताई विचारे आदी उपस्थित होते.

समाजभिमुख विकासकामे करून दाखवली. म्हणूनच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते, महिला, युवक आज सुधाकर घारे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, असे ॲड. धुळे म्हणाल्या.

या वेळी विमल देशमुख,कल्पना देशमुख, प्रभावती लोभी, प्रतिभा लोहकरे, लक्ष्मी शिंगटे, मनीषा देशमुख, दीपा कदम, अंकिता मोरे, उर्मिला विचारे, रेखा मोरे आदींनी मनोगत व्यक्त करताना आम्हाला प्रथमच व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याने आमचा आत्मविश्वास वाढला असल्याचे सांगितले. या वेळी जागृती पालकर, लक्ष्मी शिंगटे, स्नेहा पालकर, दीपा कदम, नयना आखाडे, वंदना शिंदे, वावलोली ग्रामपंचायत सदस्य रूपाली कांबेरे, सारिका लांघी, उर्मिला विचारे, मनीषा देशमुख, गायत्री भालेराव, रेखा बदे, वंदना विसावे, आरती दीक्षित, जयश्री गायकर आदी महिला उपस्थित होत्या.



# कौशल्य स्पर्धेत सहभागासाठी महास्वयं वेबपोर्टलवर नोंदणी करावी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२४, फ्रान्स (ल्योन) येथे होणार असून याकरिता जिल्हा, विभाग, राज्य आणि देशस्तरावर स्पर्धा घेतली जाणार असून याद्वारे गुणवान कौशल्य धारक पात्र स्पर्धक निवडले जाणार आहेत. जगभरातील २३ वर्षांखालील तरुणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलम्पिक खेळासारखीच आहे.

जिल्ह्यातील युवक-युवतींना या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी महास्वयं वेबपोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता केंद्राचे सहायक आयुक्त अ.मु.पवार यांनी केले आहे.

Skill India
कौशल भारत - कुशल भारत

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२४ करिता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००२ किंवा तद्नंतरचा असावा तसेच आडेटीव्ह मॅन्युफॅक्चरिंग, क्लाऊड कम्प्युटिंग, सायबर सिक्युरिटी, डिजिटल कन्स्ट्रक्शन, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, इन्फॉर्मेशन नेटवर्क केबलिंग, मेकॅट्रॉनिक्स आणि रोबोट इंटिग्रेशन वॉटर टेक्नॉलॉजी या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्मदिनांक १ जानेवारी १९९९ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे.

स्पर्धेत निवड झालेल्या उमेदवारांना वेळोवेळी लागणारे मार्गदर्शन व सहाय्य महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांच्याकडून करण्यात येईल.

महास्वयम्
कौशल्य • रोजगार • उद्योजकता

यासाठी सहभाग घेण्यास इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी www.skillindiadigital.gov.in या लिंकवर भेट देऊन World Skill Competition Registration या लिंकवर भेट देऊन १५ जानेवारीपर्यंत जास्तीत जास्त नाव नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांना खालापुरातून निरोप

**चौक** : खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांची नियमानुसार बदली झाल्याने त्यांचा निरोप कार्यक्रम नुकताच खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आला होता.

वरीष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी काम करून जातीय सलोखा राखण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक गुन्हे उघडकीस आणले आहेत. सहकारी पोलीस कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम करून त्यांचा आत्मविश्वास वाढवला. महिला पोलिसांनीही त्यांनी मोठ्या भावाप्रमाणे मदत केल्याचे सांगितले. या वेळी नव्याने रुजू झालेले वरीष्ठ पोलीस निरीक्षक खोपडे यांचेही स्वागत करण्यात आले. सपोनि. गणेश कराड यांनाही निरोप देण्यात आला. सपोनि. युवराज सुर्यवंशी, प्रदीप आरोटे, महिला उपनिरीक्षक मनवर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.









पनवेल : भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दिवंगत दि. बा. पाटील यांची ९८वी जयंती शनिवारी सर्वत्र साजरी झाली. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी 'दिबां'च्या संग्राम निवासस्थानी भेट देऊन विनम्र अभिवादन केले. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, भाजप ओबीसी सेल कोकण प्रदेश सहसंयोजिका सुहासिनी केकाणे यांनीही अभिवादन केले. (छाया : विकास म्हात्रे)
















खारघर : रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल आणि खारघर रेसिडेन्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही नमो खारघर मॅरेथॉन रविवारी आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी प्री-इव्हेंट म्हणून नमो खारघर सायक्लोथॉन झाली. या स्पर्धेचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजीव शेजवळ यांच्या हस्ते झेंडा दाखवून झाला. स्पर्धेला सायकलप्रेमी खारघरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्याची ही चित्रमय झलक.





